७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. ३ मे २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १२७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# ‘हाउसिंग स्टॉक’ मधील घरांच्या उपयोगासाठी धोरण तयार करावे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश; मुंबई उत्तर लोकसभा मतदार संघातील विविध प्रश्नांबाबत बैठक


**मुंबई (दै. संध्या)**

मुंबई महानगर प्रदेशात विविध पायाभूत सुविधा निर्मितीचे प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पांच्या पूर्णत्वामुळे मुंबईचे दळणवळण अधिक गतिमान होणार आहे. या विकास प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या नागरिकांकरिता घरांची व्यवस्था करण्यात येते.

अशा 'हाऊसिंग स्टॉक'मधील घरांच्या प्रभावी उपयोगासाठी धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वर्षा निवासस्थानी मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांबाबत बैठक झाली. बैठकीस केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विविध जागांवर विकासाची कामे सुरू आहेत. तसेच भविष्यातही विविध पायाभूत सुविधांचे प्रकल्प प्रस्तावित आहेत. केंद्रीय यंत्रणांशी समन्वय साधत अशा जागांचा संयुक्त सर्वे करण्यात यावा. विकास कामांकरिता लागणाऱ्या जमिनींबाबत केंद्र शासनाशी संबंधित बाबींकरिता संपूर्ण जागांचा एकच प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात यावा. मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाच्या अंतर्गत असलेल्या जागांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्देशानुसार पाठपुरावा करून प्रकरणे तातडीने निकाली निघण्यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करावा.

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील शेंद्रा- बिडकीन उद्योग क्षेत्रात नवीन उद्योग क्षेत्रासाठी जमिनीची आवश्यकता आहे. नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन सोबत येथील जमिनीच्या उपलब्धतेबाबत पाठपुरावा करावा. दिघी औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या कामांना गती द्यावी. मुंबई महापालिकेने शताब्दी आणि भगवती रुग्णालयामध्ये दर्जेदार रुग्णसेवेसाठी आधुनिक यंत्र सामुग्री,



स्वच्छता आणि मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी दिले.


मुंबईत सुरू असलेल्या गावठाणांचे रेखांकन गतीने पूर्ण करावे. रेखांकन पूर्ण झाल्यानंतर गावठाणामधील शेवटच्या नागरिकाला नागरी सुविधा मिळतील, याची खबरदारी घ्यावी. गोराई भागात दिल्ली येथील भारत मंडपम च्या धर्तीवर ' कन्व्हेंन्शन सेंटर' निर्माण करण्याकरिता कार्यवाही करावी. यासाठी बृहत नियोजन आराखडा बनवावा. या केंद्राचा उपयोग व्यावसायिक स्तरावर होईल, अशा पद्धतीचे नियोजन करण्यात यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

केंद्रीय मंत्री पीयूष गोयल म्हणाले, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या माध्यमातून कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येत आहे. यामध्ये उत्तर मुंबईमधील शिंपोनी कौशल विकास केंद्र तयार असून ते कार्यान्वित करावे. कांदिवली भागामध्ये क्रीडाविषयक पायाभूत सुविधांची निर्मिती पीपीपी तत्त्वावर करण्यात यावी. स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडियाच्या वतीने निर्माण करण्यात येणाऱ्या क्रीडाविषयक पायाभूत सुविधांमध्ये स्थानिक क्रीडा विभागाच्या प्रशासनाने सक्रिय सहभाग घ्यावा.

या भागातील मैदानांवर क्रीडाविषयक स्पर्धा आयोजित करण्यावर भर देण्यात यावा. केंद्र शासनाने देशाला 31 मार्च 2029 पर्यंत ' ड्रग फ्री इंडिया' करण्याचा संकल्प केला आहे. या मोहिमेत पोलीस प्रशासनाने आपले योगदान द्यावे.

मत्स्यसंपदा योजनेमध्ये किनारी गावांचा विकास करण्यात यावा. मासेमारीसाठी पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात यावी. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सध्या राहत असलेल्या नागरिकांकरिता मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करावी. या सुविधेचा पर्यटकांसाठीसुद्धा लाभ होऊ शकतो, असेही केंद्रीय मंत्री पियुष गोयल यावेळी म्हणाले.

बैठकीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्य सचिव (गृह) मनिषा म्हैसकर, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मिलिंद म्हैसकर, पोलिस आयुक्त देवेन भारती, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, एमआयडीसी मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारसू, एमएमआरडीए अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल आदी उपस्थित होते. तसेच बैठकीत मुंबई महानगर पालिका आयुक्त आश्विनी भिडे यांनी दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सहभाग घेतला.




# २०२९ ला भाजपा आणि शिंदेसेना स्वबळावर लढू शकते: शिरसाट

**मुंबई (दै. संध्या)**

भाजपा आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याची तयारी करत असल्याचा उल्लेख एका वृत्तपत्रातील संपादकीयमध्ये करण्यात आला होता. या लेखाची चर्चा होत असताना आता मंत्री संजय शिरसाट यांनीही २०२९ च्या निवडणुकीबाबत मोठे विधान केले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि शिवसेना (शिंदे) स्वबळावर निवडणूक लढवू शकतो. प्रत्येक पक्ष स्वबळावर निवडणुका लढविण्याची तयारी करत असतो, अशी प्रतिक्रिया शिरसाट यांनी दिली.



“भाजपा भविष्यातील निवडणुका स्वबळावर लढणार आहे. भाजपाची गाडी फुल झाली, चढायला जागा नाही. ही गाडी अजित पवारांचा पक्ष आणि शिंदेंच्या शिवसेनेला ठोकर मारून पुढे जाण्याच्या विचारात आहे. अजित पवारांचा पक्ष गिळण्याची तयारी झाली आहे आणि उद्या शिंदे यांचे आमदारही भाजपामध्ये जातील”, असा उल्लेख सामनाच्या संपादकीय लेखात आहे.

या उल्लेखाबाबत संजय शिरसाट यांना माध्यमांनी प्रश्न विचारला असता त्यांनी वरील उत्तर दिले. ते म्हणाले, “प्रत्येक राजकीय पक्ष आपली संघटना मजबूत करण्याच्या आणि निवडणुकांची तयारी करण्याचा प्रयत्न करत असतो. तसे करण्याचा त्यांना अधिकार आहे. मित्रपक्ष जर स्वतंत्रपणे निवडणूक लढवू इच्छित असतील तर त्यांना रोखणारी कोणतीही राजकीय व्यवस्था नाही.” भाजपा २०२९ ला स्वबळावर निवडणूक लढवू शकतो का? तर लढवू शकतो. हीच गोष्ट शिवसेना पक्षालाही लागू होते. मित्रपक्षांनी वेगवेगळी निवडणूक लढवू नये, यासाठी राजकारणात कोणताही करार किंवा बाँड नसतो. भाजपा आणि शिवसेना वेगळे होऊन अगदी एका जागेसाठीसुद्धा स्वतंत्रपणे निवडणुका लढवू शकतील, असेही मंत्री संजय शिरसाट म्हणाले.

# आयटी पार्क हिंजवडीत सुरक्षारक्षकाकडून नऊ वर्षाच्या मुलीसोबत अश्लील चाळे

**पिंपरी (दै. संध्या)**

हिंजवडी आयटी पार्क परिसरातील एका उच्चभ्रू सोसायटीतील सुरक्षारक्षकाने नऊ वर्षीय मुलीसोबत अश्लील चाळे केल्याची घटना उघडकीस आली आहे. हिंजवडी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. हा प्रकार बुधवारी (२९ एप्रिल) घडला आहे.

विजय मधुकर चव्हाण (वय २४, रा. हिंजवडी, मूळ यवतमाळ) असे अटक केलेल्या आरोपी सुरक्षा रक्षकाचे नाव आहे. त्याला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

हिंजवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी पांढरे यांनी याबाबत माहिती दिली. बुधवारी दोन लहान मुली गृहनिर्माण सोसायटीच्या आवारात खेळत होत्या. यावेळी तिथे तैनात असलेल्या आरोपीने दोन्ही मुलींना गोड बोलून आपल्याकडे बोलावून घेतले. मुली जवळ येताच त्याने त्यातील एका मुलीशी अश्लील वर्तन केले. पालकांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. तक्रार प्राप्त होताच मध्यरात्रीच्या सुमारास पोलिसांनी सोसायटीत जाऊन आरोपी विजय याला ताब्यात घेतले. त्याच्यावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ब्रेकिंग न्यूज

### बाळासाहेब थोरात यांचा ऑस्ट्रेलिया दौरा

संगमनेर (दै. संध्या) :महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकरी व साखर उद्योगासाठी महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट येथील उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळ ऑस्ट्रेलियातील शुगर रिसर्च ऑस्ट्रेलिया या जागतिकस्तरावरील अग्रगण्य ऊस संशोधन संस्थेला भेट देणार आहे. दरम्यान, या शिष्टमंडळामध्ये ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात व माजी मंत्री राजेश टोपे यांच्यासह शास्त्रज्ञांचा सहभाग आहे. या दौऱ्यामुळे महाराष्ट्रातील ऊस शेतीसाठी नवे तंत्रज्ञान, सुधारित ऊस वाण, साखर उतारा वाढविण्याच्या पद्धती व आंतरराष्ट्रीय संशोधन सहकार्याचा नवा मार्ग खुला होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. 8 मेपर्यंत शिष्टमंडळ दौऱ्यावर गेले आहे. ऑस्ट्रेलियामध्ये ऊस संशोधनासाठी आधुनिक प्रयोगशाळा, संशोधन केंद्रे व शेतस्तरीय प्रयोग यांचा प्रभावी समन्वय केला जातो. संशोधन थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची ही यंत्रणा महाराष्ट्रासाठी आदर्श ठरू शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे. यावेळी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट व शुगर रिसर्च यांच्यात सामंजस्य करार होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# दक्षिणेत जाण्यासाठी रेल्वे गाड्या वाढल्या; नांदेड, जालन्यावरुन प्रवास सुकर

**छ.संभाजीनगर (दै. संध्या)**

दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत विशेष गाड्यांना नियमित करून नवीन गाड्यांची सुरूवात करण्यात आली आहे. काही गाड्यांचा विस्तार करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. दक्षिणेत तिरुपती देवस्थानाशी जोडणाऱ्या गाड्या आता नियमित सुरू करण्यात आल्या आहेत. नांदेड आणि जालन्यावरुन जाणाऱ्या या रेल्वेमुळे स्थानिकांना मोठा लाभ मिळेल असा दावा केला जात आहे.



नांदेड – तिरुचानूर – नांदेड साप्ताहिक एक्सप्रेस नियमित सुरु केली जाणार आहे. या गाडीची मागणी अधिक होती. पूर्वी चालविण्यात येत असलेल्या विशेष गाडीचे नियमितीकरण करुन आता नांदेड – तिरुचानूर – नांदेड दरम्यान नवीन साप्ताहिक एक्सप्रेस सुरू करण्यात येत आहे.

नांदेड तिरुचानूर आणि रविवारी परतीचा प्रवास करणारी ही गाडी मराठवाड्यातील प्रवाशांना उपयोगी ठरणारी आहे. ही गाडी नांदेड, मुदखेड, निजामाबाद, वारंगल, विजयवाडा, नेल्लोर, रेनीगुंटा या स्थानकावर थांबवणार आहे.

# ट्रम्प यांची मोठी घोषणा; जर्मनीमधून पाच हजार सैन्य मागे घेण्याचे आदेश

**न्यूयॉर्क (दै. संध्या)**

अमेरिका-इराणमधील युद्धावर अद्याप कोणताही तोडगा निघालेला नाही. त्यामुळे या युद्धाचा वणवा पुन्हा पेटणार की युद्ध संपणार? असा प्रश्न संपूर्ण जगाला सतावत आहे. या युद्धाच्या घडामोडी सुरू असतानाच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक मोठी घोषणा करत जर्मनीला धक्का दिला आहे.



जर्मनीमधून तब्बल पाच हजार अमेरिकी सैन्य मागे घेण्याचे आदेश डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले आहेत. ही प्रक्रिया पुढील ६ ते १२ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण केली जाणार असल्याची माहिती सांगण्यात आली आहे. इराण युद्धावरून डोनाल्ड ट्रम्प आणि जर्मनीचे चॅन्सेलर फ्रेडरिक मेर्झ यांच्यात तीव्र शाब्दिक चकमक सुरू होती. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांनी हा निर्णय घेतल्याचं बोललं जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

याबाबत जर्मनीचे संरक्षण मंत्री बोरिस पिस्टोरियस यांनी म्हटलं की, “हा निर्णय अपेक्षित आहे, पण तरी तो एक इशारा म्हणून काम करायला हवा. युरोपियन लोकांनी आपल्या स्वतःच्या सुरक्षेची अधिक जबाबदारी घेतली पाहिजे. लष्करी विस्तार आणि जलद खरेदीच्या बाबतीत जर्मनी योग्य मार्गावर आहे”, असं पिस्टोरियस यांनी म्हटलं आहे.

“जर्मनीमध्ये सध्या तैनात असलेल्या ३६,००० अमेरिकी सैनिकांपैकी अंदाजे १४ टक्के सैन्य कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सैन्य तैनातीच्या स्थितीचा आढावा घेतल्यानंतर ६ ते १२ महिन्यांत ही प्रक्रिया पूर्ण केली जाईल”, असं पेंटागॉनकडून सांगण्यात आलं आहे.

दरम्यान, जर्मनीचे चॅन्सेलर फ्रेडरिक मेर्झ यांनी म्हटलं होतं की, “इराणकडून अमेरिकेचा अपमान केला जात आहे.” फ्रेडरिक मेर्झ यांनी अमेरिकेच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. तसेच दुसरीकडे ट्रम्प यांनी सुरक्षा आणि ऊर्जा मार्गांवर पुरेसं काम न केल्याबद्दल युरोपीयन मित्र राष्ट्रांवर टीका केली होती.

## संध्या अँकर


# इयत्ता 12 वी मधील यशस्वी विद्यार्थांचे शालेय शिक्षणमंत्र्यांकडून अभिनंदन

## आवडीनुसार आणि कल विचारात घेऊन पुढील वाटचाल करावी; शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांचे आवाहन

**मुंबई (दैनिक संध्या) :** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (12 वी) परीक्षेत यश मिळविलेले विद्यार्थी, त्यांचे पालक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी अभिनंदन करीत विद्यार्थ्यांनी आपली आवड आणि कल विचारात घेऊन पुढील वाटचाल करावी, या परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही त्यांनी हताश न होता पुन्हा नव्या उमेदीने अभ्यासाला लागावे व यश संपादन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी- मार्च 2026 मध्ये आयोजित उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता 12 वी) परीक्षेचा निकाल शनिवार दि. 2 मे 2026 रोजी मंडळाच्यावतीने जाहीर करण्यात आला.

याबाबत शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले, बारावीची परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्वाचा टप्पा आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीला आज फळ मिळाले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांच्या पालकांचा त्याग आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यांचा मोलाचा वाटा आहे. या परीक्षेतील यशानंतर विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार विविध क्षेत्रांमध्ये वाटचाल करण्याचा मार्ग खुला झाला आहे. पुढील उच्च शिक्षणासाठी ज्या ज्या क्षेत्रात विद्यार्थी जातील त्या क्षेत्रात महाराष्ट्राचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे. तुम्ही उद्याच्या भारताचे आधारस्तंभ आहात, तुमच्या कर्तृत्वातून एक समृद्ध समाज घडवण्याचे स्वप्न आपण सर्व मिळून पूर्ण करूया, अशा शब्दांत मंत्री दादाजी भुसे यांनी विद्यार्थ्यांचा गौरव केला आहे.



ही परीक्षा अंतिम ध्येय नसून, यामुळे ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही, त्यांनी खचून न जाता नव्या उमेदीने अभ्यासाला लागावे आणि यश संपादन करावे. हा निकाल विद्यार्थ्यांचे संपूर्ण भविष्य ठरवू शकत नाही. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे. यश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी जून- जुलै महिन्यात पुन्हा परीक्षा होतील. शासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, अशा शब्दात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी या विद्यार्थ्यांना दिलासाही दिला.

### निकालाची वैशिष्ट्ये

या परीक्षेत पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून विज्ञान, कला, वाणिज्य, व व्यवसाय अभ्यासक्रम व आयटीआय या शाखांसाठी एकूण 14,44,713 नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी 14,33,058 विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी 12,86,843 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्णतेची ही टक्केवारी 89.79 आहे. सर्व विभागीय मंडळांमधून कोकण विभागाचा निकाल 94.14 टक्के इतका सर्वाधिक आहे.

कोकण विभागातील 94.14 टक्के, पुणे 91.25 टक्के, अमरावती 90.92 टक्के, नाशिक 90.72 टक्के, मुंबई 90.08 टक्के, कोल्हापूर 89.97 टक्के, छत्रपती संभाजीनगर 88.68 टक्के, नागपूर 88.67 टक्के आणि लातूर विभागातील 84.14 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व विभागीय मंडळांतून नियमित मुलांची उत्तीर्णतेची टक्केवारी 86.80 टक्के असून मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी 93.15 टक्के आहे. म्हणजेच मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा 6.35 टक्क्यांनी जास्त आहे.

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी 1,42,697 विद्यार्थी प्रावीण्यासह, 3,62,033 विद्यार्थी प्रथम श्रेणीत, 5,81,519 विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर 2,00,594 विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.



# नसरापुरात वातावरण चिघळले; महामार्गावर पोलिसांचा आंदोलकांवर लाठी चार्ज

**नसरापूर (दै. संध्या)**

नसरापूर येथील साडेतीन वर्षाच्या बालिकेच्या खूनप्रकरणी नसरापूर येथे शनिवारी (दि.२) सकाळपासून नागरिकांनी ठिय्या आंदोलन सुरू केले होते. घटनास्थळी आलेल्या अधिकाऱ्यांचे सकारात्मक उत्तर न मिळाल्याने आंदोलक संतप्त झाले. त्यांनी पुणे - सातारा महामार्ग अडवून धरण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी लाठी चार्ज करून जमावाला सेवा रस्त्याच्या बाजूला घेतले. तर काही पोलिसांनी धक्काबुक्की केल्याचा काही महिलांनी आरोप केला आहे.

नसरापूर ( ता. भोर ) येथे एका साडेतीन वर्षाच्या चिमुकलीच्या खूनप्रकरणी आंदोलकांनी आरोपीला आमच्या ताब्यात द्या, जागेवरच फाशी द्या, अशी मागणी करत पुणे - सातारा महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यासाठी आगेकूच केली.

मात्र, पोलिसांनी त्या ठिकाणी तबडतोब धाव घेऊन आंदोलन करणाऱ्यांना बाजूला घेतले. यावेळी काही काळ या परिसरात पुन्हा तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. तर काही वाहन चालकांनी आंदोलकांशी वाद घातला. यावेळी पोलिसांनी महामार्ग मोकळा करून वाहने सोडण्यात आली आहे.

## संपादकीय

# सर्वांगीण विकासात महाराष्ट्र अव्वल

महाराष्ट्र दिनाच्या महाराष्ट्रातील आणि जगभरातील मराठी बांधवांना मनापासून शुभेच्छा. आज कामगार दिनसुद्धा आहे, सर्व कामगार बंधू, भगिनींनाही मन:पूर्वक शुभेच्छा!

महाराष्ट्र केवळ भौगोलिक सीमांनी बांधलेले राज्य नाही. महाराष्ट्र म्हणजे इतिहास, भूगोल आणि संस्कृतीचा समुच्चय आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी दिलेली स्वराज्याची प्रेरणा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घालून दिलेला न्याय आणि प्रज्ञेचा पाया, संतांच्या अभंगवाणीचा दिव्य वारसा, महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी पेटविलेली शिक्षण आणि समतेची मशाल, लोकमान्य टिळक यांनी जागविलेली राष्ट्रभावना, देशासाठी अनन्यसाधारण यातना सहन करण्याची ताकद देणारे स्वातंत्र्यवीर सावरकर या सगळ्यांच्या विचारांचा एकत्रित संगम म्हणजे महाराष्ट्र. केवळ भौगोलिक रचनेत महाराष्ट्र व्यक्त होत नाही तर महाराष्ट्र धर्मातून महाराष्ट्र प्रकट होतो. सर्वांवर हा महाराष्ट्र धर्म जगभरात वर्धिष्णू करण्याची जबाबदारी आहे.

यंदाचा महाराष्ट्र दिन विशेष आहे. महात्मा फुले यांच्या 200 व्या जयंतीचे हे वर्ष आहे, संत गाडगे महाराज यांच्या 150 व्या जयंतीचे वर्ष आहे, चवदार तळ्याच्या ऐतिहासिक लढ्याचे शताब्दी वर्ष आहे. हे वर्ष आपण 'समता आणि सामाजिक समरसता' वर्ष म्हणून साजरे करत आहोत. आज जग आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या संघर्षाची झळ सोसत आहे. त्याचवेळी आपले लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत सरकारने ऊर्जा सुरक्षेसाठी, पर्यायी तेल स्रोतांसाठी आणि सौर ऊर्जेच्या विस्तारासाठी उभारलेल्या कामामुळे जगातील अन्य देशांना ज्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले, तसे भारतात झाले नाही.मराठी शिकवणी

जगात कितीही आव्हाने असताना महाराष्ट्र खंबीरपणे उभा आहे. महाराष्ट्र देशाच्या जीडीपीमध्ये 13.5 टक्क्यांहून अधिक योगदान देत आहे. 2024-25 मध्ये महाराष्ट्राने 1,64,875 कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक आकर्षित केली. हे प्रमाण देशात आलेल्या एकूण एफडीएच्या 39 टक्के इतके आहे. दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्राने 30 लाख कोटींचे सामंजस्य करार केले, ज्यातून 40 लाख रोजगार निर्माण होणार आहेत. जगात आर्थिक समस्या असताना महाराष्ट्राने जगातील 30 वी अर्थव्यवस्था म्हणून झेप घेतली आहे. यावर्षी एल-निनो परिस्थितीमुळे 2026 च्या हंगामातील पाऊस सरासरीपेक्षा कमी असेल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. आपला खरीप हंगाम पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे हा अंदाज गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. पेरणीची घाई करू नका. कृषी विभागाकडून येणाऱ्या प्रत्येक सूचनांकडे लक्ष द्या. त्यातून या संकटापासून बचाव करणे सोपे जाईल. त्याचवेळी मला शेतकरी बांधवांना आश्वस्त करायचे आहे की, राज्य शासन म्हणून आम्ही आधीपासूनच पाणी, चारा याचे नियोजन प्रारंभ केले आहे. जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवारच्या कामांना गती देण्यास तसेच त्यासाठी प्राधान्याने निधी देण्यास सांगण्यात आले आहे.

गेल्या वर्षी पूर आणि अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर 15,576 कोटी रुपये जमा केले गेले. शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना आपण जाहीर केली आहेच. शेतकऱ्यांना मोफत वीज दिली जात आहे, आता सौर ऊर्जेचा मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. नैसर्गिक कितीही संकटे आली तरी महाराष्ट्राच्या विकासाचा रथ थांबणार नाही. विकसित महाराष्ट्राचा आराखडा आपण तयार केला आहे. महाराष्ट्राला 2047 पर्यंत 5 ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचे स्वप्न आणि त्या दिशेने आपण आतापासूनच काम सुरू केले आहे.

महाराष्ट्र आज देशातच नाही, जगातही पायाभूत सुविधांच्या निर्मितीत आघाडीवर आहे. सध्या मुंबई, पुणे आणि नागपूरमध्ये 173 किलोमीटरच्या मेट्रो मार्गिका कार्यरत आहेत. दरवर्षी 50 कि.मी.ची मेट्रो सेवेत येईल, असे नियोजन आहे. समृद्धीच्या साथीला शक्तिपीठ येतो आहे. वाढवण येथे चौथे मुंबई बंदर विकसित केले जाणार आहे, जे जगातील 'टॉप टेन' पैकी एक असेल. आज महाराष्ट्र दिनी मला एक अत्यंत आनंदाची बातमी सांगायची आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील 13.3 कि.मी.चा 'मिसिंग लिंक' प्रकल्प आज जनतेसाठी खुला होत आहे.

## संस्कृत सुभाषित

'मना चंदनापरि त्वा भिजावे ।
परी अंतरी सज्जना नीववावे ।।
अर्थ – असा समर्थ रामदास, चंदनाप्रमाणे भिजण्याचा जो संदेश देतात, तो स्वत: भिजून समाजाला सुगंध व शांती देण्याचा संदेश म्हणजे हा 'छायामन्यस्य कुर्वती हाच गुण होय.

## गुरु वचन

### गुण हीच महानता असते

एका दिवशी एक पंडित शास्त्रार्थ करण्यासाठी स्वामी दयानंद यांच्याकडे गेला. त्यावेळी स्वामी दयानंद जमीनीवर बसून काहीतरी लिखाण करत होते. त्यांनी त्या पंडिताला आपल्याजवळ एका आसनावर बसण्यास सांगितले. त्या पंडिताला आपल्या विद्ववतेचा अभिमान होता. यामुळे ते स्वामी दयानंद यांना कमी समजत असत. यामुळे स्वामी दयानंद यांनी त्याला जमीनीवर आपल्या जवळ असलेल्या आसनावर बसण्यास सांगितले. तेव्हा त्या पंडितास ही गोष्ट त्याचा अपमान असल्याचे वाटले. त्यांना वाटले ते तर सर्वश्रेष्ठ आहेत. यासाठी त्यांना स्वामी दयानंद यांच्यापेक्षा उंच आसन मिळायला पाहिजे. अशातच ते खाली आसनावर बसून आपला स्तर कसे कमी करु शकतात. असा विचार करुन ते उभेच राहिले. स्वामी दयानंद यांनी पंडितांच्या मनातील अवस्था चांगल्याप्रकारे ओळखली. ते पंडीतजीला म्हणाले की, उंच आसनावर बसल्यास कोणी महान होत नाही. जर असे होऊ शकत असेल तर उंच झाडावर बसलेला कावळा सर्वाधिक पुजनीय आणि महान असता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, स्वामी दयानंद पंडीतजीशी बोलत असताना समोर एका झाडावर एक कावळा बसला होता. त्या कावळ्याकडे संकेत करत स्वामी दयानंद पंडित यांच्याशी पुन्हा बोलले महानता तर त्याग, परोपकार आणि विनम्रतासारख्या गुणांमुळे सिद्ध होते. कोणताही व्यक्ती त्याच्या गुणाने महान समजला जातो. उंच आसानावर बसल्यामुळे नाही. जर आपल्यामध्ये गुण असतील तर आपण खालच्या जागेवर बसूनही तेवढेच विद्वान असतो आणि जर गुणांचा अभाव असेल तर उंच ठिकाणी बसूनही वाईट समजले जाते. स्वामी दयानंद यांची ही गोष्ट ऐकून पंडीजींचे डोळे उघडले आणि त्यांनी स्वामीजवळ असलेले आसन ग्रहण केले.

## उपदेशकथा

### स्वप्न

देशातील सर्वात मोठ्या वेड्यांच्या दवाखान्याला देशमुखांनी भेट दिली. तेव्हा एका खोलीकडे हात करुन डॉक्टर म्हणाले, '' साहेब, येथे या खोलीत विमान चालविण्याचे, ते वेगाने पळविण्याचे स्वप्न पाहणारे वेडे आहेत.'' देशमुखांनी उत्सुकतेने खिडकीतून आत पाहिले तर त्यांना तेथे कोणीही दिसेना. तसे त्यांनी डॉक्टरांना विचारले. तेव्हा डॉक्टर म्हणाले, '' साहेब, ते सर्व वेडे खोलीतच आहेत. कदाचित पलंगाखाली झोपून, आपण विमानाच्या खालीच झोपलो आहोत, अशी कल्पना करुन विमान दुरुस्त करत असतील.''

आपण सामान्य माणसेही असेच कल्पनांचे, मनोरथांचे विमान पळविण्याच्या आहारी गेलो आहोत. परंतु त्या खोलीत जसे वेडे दिसत नव्हते, तसाच स्वत:चा वेडेपणाही आपल्याला दिसत नाही.

## पंचांग

पंचांग
३ मे २०२६
रविवार

विक्रम संवत्– २०८२
वैशाख शके
संवत्– १९४८
संवत्सर –पराभवनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– वैशाख
ऋतु– सौर ग्रीष्म
कृष्ण पक्ष
तिथि:द्वितीया
२७:०२:०३+
नक्षत्र:विशाखा
०७:०९:४०

योग:वारीयन २२:२७:२५
करण:तैतिल १३:५४:३०
करण:गर २७:०२:०३+
सूर्य:मेष
चन्द्र:वृश्चिक००:२९:३८

हिजरी सन् – १४४५
मुस्लिम मास – जिल्काद
तारीख – १६

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ५१९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | | | | 4 | | |
| | 4 | 8 | 2 | 9 | 5 | | 1 | |
| | | 2 | | | 7 | | 3 | |
| | | | 4 | 5 | | 7 | | 1 |
| | | | 3 | | 9 | | | |
| 8 | | 4 | | 1 | 2 | | | |
| | 5 | | 1 | | | 3 | | |
| | 8 | | 5 | 2 | 6 | 9 | 7 | |
| | | 7 | | | | 1 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ५१८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 6 | 7 | 3 | 1 | 8 | 5 | 9 | 4 |
| 8 | 3 | 4 | 5 | 9 | 6 | 7 | 1 | 2 |
| 9 | 1 | 5 | 4 | 2 | 7 | 3 | 8 | 6 |
| 6 | 7 | 3 | 8 | 4 | 9 | 1 | 2 | 5 |
| 5 | 9 | 8 | 1 | 3 | 2 | 4 | 6 | 7 |
| 1 | 4 | 2 | 7 | 6 | 5 | 9 | 3 | 8 |
| 3 | 5 | 1 | 2 | 8 | 4 | 6 | 7 | 9 |
| 4 | 2 | 6 | 9 | 7 | 1 | 8 | 5 | 3 |
| 7 | 8 | 9 | 6 | 5 | 3 | 2 | 4 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४९४ – क्रिस्टोफर कोलंबसला पहिल्यांदा जमैकाचा किनारा दिसला.
- १७९१ – पोलंडने मे संविधान अंगिकारले.
- १८१० – लॉर्ड बायरन हेलेस्पॉन्टची खाडी पोहून गेला.
- १८६० – चार्ल्स पंधरावा स्वीडनच्या राजेपदी.

### राष्ट्रीय

- २००६ – उत्तरांचल परिवहन महामंडळाची एक बस कोसी नदीत कोसळली, यात २१ जण ठार तर २६ लोक जखमी झाले.

### जन्म

- ०६१२ – कॉन्स्टन्टाईन तिसरा, बायझेन्टाईन स्म्राटाचा जन्म.
- १८४९ – बर्नहार्ड फोन ब्युलो, जर्मनीचा चान्सेलरचा जन्म.
- १८६७ – जे.टी. हर्न, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.
- १८९७ – झाकीर हुसेन, भारतीय राष्ट्रपती यांचा जन्म.
- १८९८ – चित्रपट महर्षी भालजी पेंढारकर, मराठी चित्रपट दिग्दर्शकाचा जन्म.
- १८९८ – गोल्डा मायर, इस्रायेलची पंतप्रधानांचा जन्म.
- १९४५ – सादिक मोहम्मद, पाकिस्तानी क्रिकेटपटूचा जन्म.
- १९५५ – डेव्हिड हूक्स, ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटूचा जन्म.
- १९५९ – उमा भारती, भारतीय राजकारणीचा जन्म.

### निधन

- १२७० – बेला चौथा, हंगेरीचा राजाचे निधन.
- १४८१ – महमद दुसरा ऑट्टोमन स्म्राटाचे निधन.
- १७५८ – पोप बेनेडिक्ट चौदावा यांचे निधन.
- १९४२ – थोर्वाल्ड स्टॉनिंग, डेन्मार्कचा पंतप्रधानाचे निधन.

## : SMS :

Ek yug tha jab log apne ghar ke dwar pe likhte the: ATITHI DEVO BHAVA
Phir likha: SHUBH LABH
Phir likhne lage: U R WELCOME
Aur ab likhte hain: KUTTON SE SAVDHAN

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.८ | २५.४ |
| अहमदनगर | ३६.७ | २३.३ |
| अकोला | ४२.५ | २८.६ |
| अमरावती | ४०.७ | २९.२ |
| बीड | ४२.६ | २८.८ |
| भंडारा | ४२.३ | २८.१ |
| बुलढाणा | ३६.७ | २३.३ |
| चंद्रपूर | ४२.२ | २९.३ |
| चेन्नई | ४६.२ | ३३.३ |
| नवी दिल्ली | ३७.५ | २८ |
| धुळे | ४०.८ | २६.५ |
| गोंदिया | ४०.२ | २७.६ |
| जळगाव | ४१.७ | २८.२ |
| कोल्हापूर | ३६.४ | २०.८ |
| लातूर | ३७.४ | २५.९ |
| मुंबई | ३८.१ | ३१.२ |
| नागपूर | ४१.२ | २७.५ |
| नांदेड | ४०.८ | २७.४ |
| नंदूरबार | ३७.९ | २६.६ |
| नाशिक | ३६.७ | २२.५ |
| पुणे | ३३.७ | २२ |
| पंढरपूर | ३८ | २६.८ |
| सातारा | ३५.५ | १८.९ |
| सांगली | ३७.३ | २१.६ |
| सोलापूर | ३८.१ | २७.५ |
| वर्धा | ४१.७ | २९.३ |
| वाशिम | ४०.१ | २६.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** पुढे घडणाऱ्या घटनांची आपल्याला चाहूल लागेल. सकारात्मक विचारांमुळे अनपेक्षित चांगल्या गोष्टी घडतील.

**वृषभ :** घरातील सुखसुविधा वाढविण्याकरीता महिला नवीन खरेदीचे मनसुबे आखतील. सतत पाहुण्यांची वर्दळ राहील.

**मिथून :** संततीच्या उत्कर्षाची वार्ता कानी येईल. हितशत्रूंच्या कारवायांवर मोठया युक्तीवादाने मात करता येईल. शेवटी विजय आपलाच होईल.

**कर्क :** विवाहेच्छूक तरुणांचे विवाह ठरतील. जनसंपर्कातून लाभ होतील. आपल्या इच्छा, अपेक्षा स्वत:च्या काबूत ठेवाव्यात.

**सिंह :** उधारी उसनवारी टाळावी. मोठे आर्थिक व्यवहार तूर्त टाळावेत. कामानिमित्त प्रवास घडतील. अपेक्षित पत्रव्यवहार होतील. भावंडांशी सुसंवाद साधाल.

**कन्या :** जोडधंद्यातून चांगली आर्थिक प्राप्ती होईल. कौटुंबिक शुभ–समारंभाचे आयोजन केले जाईल. कुटुंबियांचे सहकार्य लाभेल.

**तूळ :** धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. समाजकार्यासाठी तसेच धार्मिक कार्यासाठी निधी उभा करण्यात आपला पुढाकार राहील.

**वृश्चिक :** राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांना समाजात नावलौकिक मिळेल. कामाच्या व्यापात आपल्या प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करु नका.


**धनू :** कोणत्याही मोहाला बळी पडू नका. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. राजकीय कार्यकर्त्यांना काही अडचणींना सामोरे जावे लागेल.

**मकर :** नवीन नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांना चांगल्या संधी लाभतील. तरुणांच्या कौशल्याला चांगला वाव मिळेल.

**कुंभ :** राहत्या जागेचे किंवा व्यवसायाच्या जागेचे प्रश्न सुटतील. महिला स्वत:च्या पद्धतीने गृह सजावट करतील. महिलांना बदलाची नितांत गरज भासेल.

**मीन :** यशस्वी होण्यासाठी इतरांवर अवलंबून राहू नका. स्वत:चे प्रयत्न स्वत:च करावेत. नवनवीन प्रकल्प हाती घेऊन यशस्वीपणे पूर्ण कराल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ५१९



**आडवे शब्द**
१. मोहक, सुंदर, मनाला भावणारे
४. पायापासून डोक्यापर्यंत
८. टोळीचा प्रमुख
१०. एकाग्र नजर
११. छोटा हिरा
१२. सुसर
१३. मोठ्या प्रमाणावर वस्तूनिर्मिती करणारा उद्योग
१५. धाग्यापासून कापड तयार करणारा
१७. संकट
१९. नांगराची रेघ
२०. स्वर्गातील एक अप्सरा
२२. सतत मागण्याचा स्वभाव
२३. छोटे कुबड
२४. जहर २५. चांदी
२६. एक तारवाद्य
२८. लाकूड कापण्याचे सुताराचे हत्यार
३०. विचार मांडण्यासाठी बोलवलेली बैठक
३१. नृत्य
३३. माझे
३४. नाशाचे मंत्रतंत्र
३५. राजीवलोचन
३८. किंचित वक्रता
३९. एकूण एक, सर्व
४०. नाकावरील छोटा दागिना
४२. मेंढपाळ
४५. सुखदायक
४६. जाड, स्थूल
४८. सबब, निमित्त
४९. सरकारचे शिक्कापत्र, पदवी
५०. गोल घुमटाचे गाव
५१. शिव्या देणे एवढे सन्मानपूर्वक?
५५. वाढणारे
५६. कडक स्वभाव
५८. नवे धान्य
५९. सन्मानार्थ रक्कम
६१. बंदुकीच्या गोळीचा आवाज
६२. वडील, पिता
६२अ. बेचव, रुचिहीन
६३. देह, शरीर
६५. हंस, कमळ
६७. गंगा
६९. तुरुंग
७१. मृत्यू, वेळ
७२. यज्ञ
७३. कुंफ्कून वाजवायचे एक वाद्य
७६. च्या शिवाय
७७. मान्यतेचा शब्द
७८. आप्त, सगा
७९. शेणाचा गोळा
८०. आच्छादान

**उभे शब्द**
१. मडके, जुगाराचा एक प्रकार
२. गडीमाणसे
३. चार आठवड्याचा काळ
४. जाणणे, समजणे
५. जल
६. प्राणांतिक वेदना
७. पळसाचा डिंक
८. प्रश्नांचा भडीमार
९. प्रजा
१४. विशेष १६. केस
१८. माया, जिव्हाळा
२०. पहिली रास
२१. व्यवस्था, उद्योग
२३. भरीवच्या विरुद्ध
२४. वितरण करणारा
२६. वेळ
२७. कांती, तेज
२९. गणितातील उणे
३०. संतोषजनक
३२. छोटी लढाई
३३. मनसोक्त
३६. झकास
३७. रेवा नदी
४०. हालचाल
४१. निर्बुद्ध
४३. मगज
४४. तोफगाडी
४५. चेहरा
४७. नमाजासाठी बोलवणे
४९. नेहमी
५०. हवाईअड्डा
५२. पंतप्रधान
५३. काळ्या तोंडाचे मोठे माकड
५४. अवधान, लक्ष
५७. खोडण्याचे साधन
५९. स्वाभिमानी स्त्री
६०. मनाने घेतलेली भीती
६४. वर्तमानपत्रातील कप्पा
६५. समोरांसमोर युद्ध
६७. प्रश्न
६८. चावी
७०. दशानन
७४. युद्ध (हिंदी)
७५. परमेश्वर

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ५१८ चे उत्तर

आडवे उत्तर : १.वजनदार ५.ज्वालामुखी ८.लोह १०.ऐरावत ११.जात १३.रमणीय १५.पत १६.द्रव्य १७.पडसाद २०.पुष्ट २२.बाहेरख्याली २४.गुच्छ २५.सरकार २७.लाट २९.वय ३१.भोजन ३३.गुळगुळीत ३४.खटपट ३६.काया ३८.वटी ३९.कासव ४१.परत ४२.सातत्य ४४.पिठीसाखर ४५.गर्व ४६.जरठ ४७.खडतर ४८.तहान ५०.लेखिका ५२.वेडा ५५.शृंग ५६.जयघोष ५९.अनवरत ६२.वामांगी ६३.टाक ६४.समक्ष ६५.महान ६६.टाळा

उभे उत्तर : १.वरात २.जव ३.नतद्रष्ट ४.रजा ६.लालसा ७.खीर ८.लणी ९.हय १०.ऐपत १२.तप १४.मकरध्वज १८.डबीर १९.दबाव २०.पुच्छ २१.करवतकाठी २३.लीला २४.गुटगुटीत २६.काय २८.भंगुर ३०.फूट ३१.भोट ३२.नकार ३४.खवखव ३५.पक्षी ३७.यातना ३८.वसाहत ४०.ससा ४१.पर्वतप्राय ४३.त्यजन ४४.पिठले ४५.गड ४७.खडा ४९.हास्य ५१.खिल्लार ५२.वेगवान ५३.प्रेषक ५४.खून ५६.जगी ५७.घोटाळा ५८.खास ५९.अक्ष ६०.वजा ६१.तम

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

IDBI BANK

### आयडीबीआय बँके तर्फे आर्थिक वर्ष 26 च्या 4 थ्या तिमाहीचे वित्तीय निष्कर्श जाहीर

पुणे (दैनिक संध्या) : आयडीबीआय बँके तर्फे आज त्यांच्या आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या निष्कर्शांची घोषणा केली. वर्ष २६ च्या तिसऱ्या तिमाहीत निव्वळ नफा हा रु.१,९३५ कोटी झाला. आर्थिक वर्ष २६च्या ४थ्या तिमाहीत कार्यातून होणारा नफा हा रु. १,९४३ कोटींवर गेला. एनआयएम ची टक्केवारी ही ४.१५ टक्के झाली, वार्षिक तुलनेत १५ बीपीएस ची वाढ आहे. सीआरएआर ची टक्केवारी २६.६५ टक्के असून वार्षिक तुलनेत १६९ बीपीएसची वाढ झाली. रिटर्न ऑन ॲसेट्स (आरओए) ची आकडेवारी २.२७ टक्के, वार्षिक तुलनेत २९ बीपीएसची वाढ झाली आहे. निव्वळ एनपीए चे गुणोत्तर हे ३१ मार्च २०२६ रोजी ०.१५ टक्के होते, ३१ मार्च २०२६ रोजी एनपीए च्या गुणोत्तरात सुधारणा होऊन २.३२ टक्के झाली, जी ३१ मार्च २०२५ रोजी २.९८ टक्के होती. सप्टेंबर २०२३ पासून ९९ टक्क्यांचे सातत्य राखत पीसीआर ची टक्केवारी ही ३१ मार्च २०२६ रोजी ही ९९.३९ टक्के झाली.

### 'कै. सुरेश कलमाडी क्रीडारत्न पुरस्कार' अंजली भागवत आणि सुंदर अय्यर यांना जाहीर

पुणे (दैनिक संध्या) : भारतीय ऑलिम्पिक महासंघाचे माजी अध्यक्ष व देशात क्रीडा संस्कृती रुजविणारे माजी रेल्वे राज्यमंत्री व पुण्याचे दिवंगत खासदार सुरेश कलमाडी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ 'सुरेश कलमाडी क्रीडारत्न पुरस्कार' जाहीर करण्यात आले असून, यंदापासून सुरु करण्यात आलेल्या या पहिल्या पुरस्काराचे आंतरराष्ट्रीय नेमबाज अंजली भागवत आणि लॉन टेनिस संघटक सुंदर अय्यर याचे मानकरी आहेत. २५,००० रुपये, सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुणे हौशी ॲथलेटिक संघटनेतर्फे हे पुरस्कार दरवर्षी एक खेळाडू व एक क्रीडा संघटक यांना दिले जाणार असून त्याची घोषणा कै. सुरेश कलमाडी यांच्या १ मे या जन्मदिनी दरवर्षी केली जाईल. यंदाच्या पुरस्कार प्रदान समारंभाची तारीख लवकरच जाहीर केली जाईल असे पुणे हौशी ॲथलेटिक संघटनेचे अध्यक्ष ॲड. अभय छाजेड यांनी सांगितले. पुण्यात मॅरेथॉन भवन येथे १ मे या कै. सुरेश कलमाडी यांच्या जन्मदिनानिमित्त झालेल्या खेळाडू व क्रीडा संघटकांच्या बैठकीत प्रथम कै. सुरेश कलमाडी यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी ॲड. अभय छाजेड म्हणाले की "सुरेश कलमाडी हे भारतीय ऑलिम्पिक महासंघाचे १९९६ ते २०१२ असे तब्बल १६ वर्ष अध्यक्ष होते. तसेच एशियन ॲथलेटिक्स असोसिएशनचे ते २००० ते २०१३ अध्यक्ष होते. याआधी १९८७ ते २००५ ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाचे ते अध्यक्ष होते. २००८ मध्ये पुण्यात राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा आणि २०१० मध्ये नवी दिल्लीत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे त्यांनी भव्यतेने यशस्वी आयोजन केले. याशिवाय पुणे, बँगलोर, मणिपूर, पंजाब, हैदराबाद, गोहत्ती आणि झारखंड येथे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन आणि २००३ मध्ये ॲफ्रो-एशियन गेम्स यांचे त्यांनी यशस्वी आयोजन केले. देशात पहिली आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन पुण्यात भव्यतेने त्यांनी सुरु केली. तसेच पुण्यात म्हाळुंगे-बालेवाडी येथे श्री. शिवछत्रपती क्रीडानगरी उभारण्यातही त्यांचा मोठा वाटा होता. देशात त्यांनी ॲथलेटिक्स क्रीडा संस्कृती रुजवली आणि हजारो तरुण खेळाडू पुढे आणण्यात मोलाचे योगदान दिले. पुण्याचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडा नकाशावर नेणाऱ्या कै. सुरेश कलमाडी यांची स्मृती जागती ठेवण्यासाठी यंदापासून हे पुरस्कार सुरु करण्यात आले आहेत." असे ॲड. अभय छाजेड म्हणाले.

### पुणे परिमंडलातील 63 वीज कर्मचाऱ्यांचा पुरस्काराने गौरव

पुणे (दैनिक संध्या) : महावितरणच्या रास्तापेठ येथील परिमंडल कार्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्य अभियंता सुनिल काकडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर परिमंडलातील ६३ वीज कर्मचाऱ्यांचा उत्कृष्ट यंत्रचालक व उत्कृष्ट तंत्रज्ञ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड, कार्यकारी अभियंता शैलेश जैन, सतीश खाकसे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भुपेंद्र वाघमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना मुख्य अभियंता काकडे म्हणाले, 'वीज कर्मचाऱ्यांचा ग्राहकांशी थेट संबंध येतो. त्यांच्या कामावरच महावितरणची प्रतिमा अवलंबून असते. सर्वांनी ग्राहकाभिमुख होऊन ग्राहक तक्रारींचा वेळेत निपटारा करावा व कंपनीचा महसूल वाढवावा.' वर्षभरात सरस कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना महावितरण दरवर्षी पुरस्काराने गौरव करते. त्यासाठी मुख्यालयाने लावलेल्या निकषांधारे कर्मचाऱ्यांची निवड केली जाते. यावर्षी ६३ कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार मिळाला. यामध्ये १२ यंत्रचालक तर ५१ तंत्रज्ञांचा समावेश आहे. पुरस्कारार्थींपैकी हरिष बोळे, मनोज केदार, कल्पना घोडके व विकास नवले यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन महेश कारंडे यांनी केले.

### लक्ष्मीबाई दगडूशेठ दत्तमंदिरात 'आम्र महोत्सव'

पुणे (दैनिक संध्या) : वैशाख पौर्णिमेनिमित्त बुधवार पेठेतील श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिरात आम्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंदिरातील गाभारा आणि श्री दत्त महाराजांसमोर १ हजार आंब्यांची आरास करण्यात आली. कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टच्या वतीने मंदिरात आम्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्री दत्त महाराजांची माध्यान्ह आरती महाराष्ट्र भाजपा सरचिटणीस राजेश पांडे आणि लोकप्रिय सिने कलाकार प्रविण तरडे यांचे हस्ते झाली. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष ॲड.शिवराज कदम जहागिरदार, कार्यकारी विश्वस्त ॲड. रजनी उकरंडे, कोषाध्यक्ष युवराज गाडवे, उत्सव प्रमुख महेंद्र पिसाळ, उप उत्सवप्रमुख अक्षय हलवाई, विश्वस्त ॲड.प्रताप परदेशी, डॉ. पराग काळकर, सुनिल रुकारी, राजेंद्र बलकवडे यांसह भाविक मोठया संख्येने उपस्थित होते. आरतीनंतर सर्व भाविकांना आमरसाचा प्रसाद देखील देण्यात आला. यावेळी देऊळबंद - २ या श्री स्वामी समर्थांच्या उपदेशाने शेतकरी आत्महत्या रोखण्याचा आशय असणाऱ्या नवीन चित्रपटाची प्रवीण तरडे यांनी माहिती दिली. या चित्रपटाचे उत्पन्न आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या अपत्यांच्या



# पुण्यात ६७ वा महाराष्ट्र दिन उत्साहात संपन्न

**■ विशेष सन्मानचीन्ह प्राप्त पोलीसांचा केला गौरव**

## जनगणना २०२७ प्रक्रिया १ मे पासून सुरू; नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा -राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**पुणे (दै. संध्या) :**

जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्याला आज, १ मे २०२६ पासून राज्यभर प्रारंभ होत असून नागरिकांनी या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नगर विकास व परिवहन राज्यमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ यांनी केले. पोलीस कवायत मैदान येथे त्यांनी महाराष्ट्र दिनाचे ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. त्या प्रसंगी त्यांनी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

समारंभाला विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेशकुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त शुभेच्छा देताना राज्यमंत्री मिसाळ यांनी राज्याच्या सामाजिक व ऐतिहासिक वारशाचा उल्लेख केला. महात्मा ज्योतीबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त, तसेच संत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंती वर्ष आणि महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'सामाजिक समता व समरसता वर्ष' साजरे करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र ही केवळ भौगोलिक सीमा नसून विचारांची भूमी असल्याचे नमूद करत त्यांनी शौर्य, त्याग, समता आणि प्रगती या मूल्यांवर राज्याचा पाया अधिक भक्कम करण्याची गरज व्यक्त केली. देशाच्या सीमांवर कार्यरत सैनिकांप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.



जनगणना २०२७ संदर्भात त्यांनी सांगितले की, पहिल्या टप्प्यात घर यादी व घरगणना केली जाणार असून १ ते १५ मे दरम्यान नागरिकांना 'स्व-गणना' करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यानंतर १६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणक घरोघरी भेट देऊन माहिती संकलित करतील असे सांगून नागरिकांनी त्यांना सहकार्य करावे असे आवाहन केले.

समाजाच्या प्रगतीत शेतकरी, कामगार, शिक्षक आणि युवक यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगून सामाजिक समता, बंधुता आणि न्याय यांची जोपासना करण्याचे आवाहन त्यांनी केले. महिलांचा सन्मान, बालकांचे संरक्षण आणि वंचित घटकांचा विकास हीच खरी प्रगती असल्याचे त्या म्हणाल्या. पर्यावरण संवर्धनासाठी पाणी, वृक्ष आणि मातीचे जतन करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

शेवटी, स्वच्छ, सुरक्षित आणि समृद्ध महाराष्ट्र घडवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करण्याचे आवाहन करत त्यांनी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, आमदार भिमराव तापकीर, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, पीएमआरडीएचे आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी, आयुक्त विजय सूर्यवंशी, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जिल्हा उप निवडणूक अधिकारी मिनल कळसकर याच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकारी,कर्मचारी, नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र दिन व कामगार दिन; कॉँग्रेस कमिटीतर्फे साजरा

**पुणे (दै. संध्या) :**

पुणे शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटीतर्फे महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन कॉँग्रेस भवन येथे साजरा करण्यात आला. पुणे शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. अरविंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

आपल्या भाषणात मा. अरविंद शिंदे म्हणाले की, "१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली व मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली. महाराष्ट्र राज्य स्थापनेसाठी संयुक्त महाराष्ट्र समितीने पुढाकार घेऊन आंदोलने केली. संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना ६ फेब्रुवारी १९५६ रोजी कै. केशवरावजी जेधे यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात स्थापना झाली. या संयुक्त महाराष्ट्र आंदोलनास एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, श्रीपाद अमृत डांगे, पी. के. अत्रे, भाई उध्दवराव पाटील



व अनेक नेत्यांनी भाग घेतला. या आंदोलनात १०५ जणांना आपला जीव गमवावा लागला व ते हुतात्मे झाले. ४ मे १८८६ रोजी शिकागोमध्ये कामगारांनी संप केला. त्या कामगारांची प्रमुख मागणी अशी होती की, कामगारांना त्यांच्या २४ तासांपैकी ८ तास काम, ८ तास विश्रांती व ८ तास करमवणूकीसाठी वेळ द्यावा. त्यांच्या या संपावर पोलीसांनी गोळीबार केला व चार कामगार मृत्यूमुखी पडले. जगभरात १ मे आंततरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील १०६ हुतात्म्यांच्या बलिदानानंतर आणि अनेक वर्षांच्या संघर्षांनंतर बॉम्बे पुनर्रचना कायद्यानुसार मुंबईसह महाराष्ट्राची निर्मिती झाली, ज्याची आठवण म्हणून हा दिवस पाळला जातो "

यावेळी शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या समवेत माजी आमदार दिप्ती चवधरी, प्रदेश खजिनदार ॲड. अभय छाजेड, माजी नगरसेवक अजित दरेकर, बाळासाहेब अमराळे, शहर उपाध्यक्षा प्राची दुधाणे, अर्चना शहा, सिमा सावंत, राज अंबिके, द. स. पोळेकर, आबा जगताप, रमेश पवळे, प्रवीण करपे, अनिता धिमधिमे, सुंदर ओव्हाळ, चेतन अगरवाल, सेवादलाचे मुख्य संघटक लतेंद्र भिंगारे, प्रदेशचे रवि म्हसकर, शशिकांत बिबवे, राजाभाऊ कदम, रंजना रजपूत, लता जाधव, शैला कदम, वैशाली माटे, हरिदास अडसूळ, उत्तम आल्हाट, बाबासाहेब जाधव, प्रल्हाद खेसे, मीना कदम, सरोजिनी काटे, सुरेश राठोड, आसिफ शेख, उदय लेले, राहुल शर्मा, फिरोज शेख, दिलीप लोळगे आदींसह कॉँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## एमआयटी एडीटी विद्यापीठात पदवी फॅशन शो दिमाखात संपन्न

**पुणे (दै. संध्या) :**

फॅशन म्हणजे केवळ डिझाईन नव्हे, तर ती आपली ओळख असते. आपण केलेल्या प्रत्येक डिझाईनद्वारे जगाला त्यांच्या संस्कृतीची, वेशभूषेची एक कथा सांगितली जाते. त्यामुळे स्वतःच्या कल्पनांशी कायम प्रामाणिक राहा, सातत्याने नवकल्पना करत राहा आणि जगाला आणखी सुंदर बनवा, असे मत पेपरमिंट क्लोदिंग प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक संतोष कटारिया यांनी मांडले.

ते एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन (आयओडी)च्या फॅशन विभागाचा ११ वा वार्षिक ग्रॅज्युएशन फॅशन शो (जीएफएस) २०२६ निमित्ताने बोलत होते. याप्रसंगी 'ग्लॅड यू केम अँड ग्लॅड वी मेट'चे संस्थापक मॅडी अमृतकर, सुप्रसिद्ध फॅशन डिझायनर टीना रांका, विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ. सायली गणकर, प्र-कुलगुरू डॉ. नचिकेत ठाकूर, प्रा. डॉ. दांडेश्वर बिसोई, तसेच फॅशन डिझाईन विभाग प्रमुख डॉ. अर्शिया कपूर आदी उपस्थित होते.

या फॅशन शोमध्ये २०२२–२०२६ या बॅचमधील बी.डिझ. फॅशन कम्युनिकेशन, बी.डिझ. फॅशन डिझाईन आणि एम.डिझ. फॅशन मॅनेजमेंट व मार्केटिंग या अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांनी डिझाईन कलेक्शन्स, फॅशन फिल्म्स, प्रकाशने आणि ब्रँडिंग प्रोजेक्ट्स सादर केले. प्रत्येक सादरीकरणातून विद्यार्थ्यांची वैयक्तिक डिझाईन ओळख आणि व्यावसायिक तयारी स्पष्टपणे दिसून आली.

## 'दगडूशेठ' गणपतीला ५ हजार शहाळ्यांचा महानैवेद्य

**पुणे (दै. संध्या) :**

उन्हाच्या काहिलीपासून भक्तांचे रक्षण व्हावे आणि दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष, शेतकऱ्यांच्या समस्या दूर व्हाव्या, असे मागणे मागत दगडूशेठ गणपती बाप्पांना शहाळे महोत्सवात ५ हजार शहाळ्यांचा महानैवेद्य दाखविण्यात आला. शिव-पार्वतीच्या घरी वैशाख शुद्ध पौर्णिमेच्या शुभदिनी दुर्मती राक्षसाच्या वधार्थ पुष्टिपती विनायक हा अवतार झाला. त्यानिमित्ताने मंदिरात शहाळे महोत्सव आयोजित करण्यात आला.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे मंदिरात शहाळे महोत्सव आयोजित करण्यात आला. वैशाख शुद्ध पौर्णिमेला सूर्योदयाच्यावेळी गणेश जन्माची पूजा व अभिषेक झाला. तसेच पं. रघुनंदन पणशीकर यांनी गायनसेवा अर्पण केली. मंदिरामध्ये



गणेशयाग देखील करण्यात आला.

श्री गणेशांचे विविध लीला स्वरुपात अनेक अवतार पाताळ, पृथ्वी व स्वर्गलोकात झाल्याचे आपल्या पुराणात सापडते. त्यापैकी एक म्हणजे पुष्टिपती विनायक अवतार. दुर्मति राक्षसाने पृथ्वी-पाताळ-स्वर्गलोक जिंकून सर्वत्र विध्वंस चालविलेला होता. त्याचा नित्पात करण्याकरिता पार्वती मातेला दिलेल्या वरानुसार भगवान श्री गणेशांनी विनायक अवतारामध्ये प्रकट होऊन दुर्मती राक्षसाचा वध केला त्यामुळे वैशाख शुद्ध पौर्णिमेचा दिवस हा पुष्टिपती विनायक जयंती म्हणून साजरा केला जातो.

त्यामुळे गाभाऱ्यासह सभामंडपात शहाळ्यांची व वृक्षांची नयनरम्य आरास करण्यात आली होती. श्रीगणेश पुराण व मुद्गल पुराण या ग्रंथामध्ये या अवताराचा संदर्भ आढळतो. या अवतारामध्ये पुष्टी ही भगवान विष्णुंच्या घरी त्याची मुलगी म्हणून जन्म घेते व श्री गणेश हे विनायक स्वरुपात शंकर-पार्वती यांच्या घरी जन्म घेतात.

## पुणे महानगरपालिकेच्यावतीने महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६७वा स्थापना दिन संपन्न

**पुणे (दै. संध्या) :**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त शुक्रवार दि. ०१ मे २०२६ रोजी मा. महापौर, मंजुषा दीपक नागपुरे, पुणे महानगरपालिका यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

महापौर मंजुषा दीपक नागपुरे यांनी पुणे महानगरपालिके च्या प्रांगणातील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्टीत पुतळ्यास पुष्प अर्पण केली. त्यानंतर महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण केली. त्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच ध्वजारोहणा पूर्वी



राष्ट्रीयगीत (वंदे मातरम) म्हणण्यात आले. सकाळी ७.१० वाजता मा. महापौर मंजुषा दीपक नागपुरे यांचे शुभ हस्ते ध्वजारोहण व ध्वजवंदन करण्यात आले. यावेळेस राष्ट्रगीत व महाराष्ट्र राज्याचे राज्यगीत म्हणण्यात आले.

या प्रसंगी मा. महापालिका आयुक्त नवल किशोर राम, मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) श्रीमती पवनीत कौर व मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) श्री ओमप्रकाश दिवटे आणि विविध विभागांचे खातेप्रमुख, उपायुक्त,अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## चलवादी शिक्षण संस्थेत बुद्ध पौर्णिमा, महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन उत्साहात साजरा!

# कामगारांच्या हस्ते ध्वजारोहण अन शिक्षकांचा 'संविधान' देऊन सन्मान

**पुणे (दै. संध्या) :**

विद्यानगर येथील चलवादी शिक्षण संस्थेच्या पुणे इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमेचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे, श्रमाचा गौरव करीत शाळेतील महिला कामगार गीताताई सनदी यांच्या हस्ते ध्वजारोहण करून सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला. ध्वजारोहणानंतर तथागत गौतम बुद्ध, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि संस्थेचे संस्थापक स्वर्गीय मरिअप्पा चलवादी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून



बुद्ध वंदना घेण्यात आली.

या सोहळ्यासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. हुलगेश चलवादी आणि उपाध्यक्षा ॲड. रेणुका चलवादी (शिर्के) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. इयत्ता दहावीच्या शंभर टक्के निकालाची शाळेची परंपरा कायम राखण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या शिक्षकांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाल आणि 'भारतीय संविधानाची' प्रत देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.हुलगेश चलवादी म्हणाले की, "शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. कामगारांच्या कष्टांमुळेच देशाची प्रगती शक्य होते, तर भगवान बुद्धांनी दिलेला समतेचा आणि शांततेचा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न घेता विद्यार्थ्यांनी संविधानातील मूल्यांचे जतन करावे.

ज्याप्रमाणे महाराष्ट्र ही संतांची आणि शौर्याची भूमी आहे, त्याचप्रमाणे आपल्या कर्तृत्वातून देशाला नवी दिशा देण्याची जबाबदारी नव्या पिढीवर आहे. शाळेतील शंभर टक्के निकालाची परंपरा ही येथील शिक्षकांच्या निष्ठेचे प्रतीक असून, भविष्यातही आपण अशाच प्रकारे ज्ञानाच्या माध्यमातून सक्षम समाज घडवूया," असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या महाराष्ट्र गीत, समूहगीताने आणि 'मी जिजाई बोलते' या एकपात्री प्रयोगाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य स्मिता लोंढे, सायली शिंदे, ज्योती सचदेव, जयश्री कदम, अश्विनी मोहिते व बिना कदम यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व शिक्षक, कर्मचारी, पालक व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## ‘टीबी मुक्त भारत’ अभियान झोपडपट्ट्यांपर्यंत नेण्याचा राज्यपालांचा संकल्प

मुंबई (दैनिक संध्या) : ‘टीबी मुक्त भारत अभियान’ मुंबईतील प्रत्येक झोपडपट्टीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी शुक्रवारी लोकभवन, मुंबई येथे व्यक्त केला आहे. महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त लोकभवन येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपालांनी ‘टीबी मुक्त भारत – लोकभवन महाराष्ट्र उपक्रम’ या विषयावरील पोस्टरचे अनावरण केले. उपक्रमाबाबत अधिक माहिती देताना राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी राज्यपालांचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या देशातून क्षयरोग निर्मूलनाच्या आवाहनाशी सुसंगत असल्याचे सांगितले. मुंबईतील दाट लोकवस्तीच्या झोपडपट्ट्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

## भुसावळात अवैध शस्त्रसाठा जप्त; 19 वर्षीय तरुण अटकेत

भुसावळ (दैनिक संध्या) : शहरातील एका वॉटर पार्कच्या मागील परिसरात अवैध शस्त्रे बाळगून फिरणाऱ्या १९ वर्षीय तरुणाला भुसावळ बाजारपेठ पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीकडून दोन गावठी पिस्तुले (कट्टे) आणि एक धारदार गुप्ती जप्त करण्यात आली आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि. १) रात्री सुमारे ८ वाजता पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, एका मोकळ्या जागेत संशयास्पद हालचाली करणारा तरुण शस्त्रांसह थांबला आहे. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ सापळा रचून कारवाई केली. पोलिसांची चाहूल लागताच पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या भूषण शांताराम कोळी (वय १९) याला शिताफीने ताब्यात घेण्यात आले. आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडून दोन गावठी पिस्तुले (मॅगझीनसह), १३.५ इंच पाते असलेली गुप्ती आणि एक मोबाईल असा सुमारे ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संबंधित शस्त्रे बाळगण्यासाठी कोणतीही परवानगी नसल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्यात आर्म ॲक्ट कलम ३/२५, ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१), १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत असून, आरोपीने ही शस्त्रे कुठून आणली आणि त्यांचा वापर कशासाठी होणार होता, याचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे भुसावळ शहरासह जळगाव जिल्ह्यात चिंता व्यक्त होत आहे.




## अखेर स्मार्ट सिटी प्रकल्प बंद

छत्रपती संभाजीनगर (दैनिक संध्या) : केंद्र सरकारने स्मार्ट सिटी प्रकल्प बंद केला आहे. त्यामुळे राज्य शासनाने शिल्लक कामे पूर्ण करण्यासाठी दोन-वेळा मुदतवाढ दिली. अखेर गुरुवारी शासन आदेशानुसार महापालिका आयुक्त अमोल येडगे यांनी सर्व ४३ प्रकल्प महापालिकेकडे हस्तांतरित करून घेत कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ मध्ये देशातील १०० शहरांसाठी स्मार्ट सिटी अभियान सुरू केले होते. यात दुसऱ्या टप्प्यात म्हणजेचे २०१६ साली छत्रपती संभाजीनगरचा अभियानात समावेश झाला. या निवडीनंतर तब्बल एक हजार कोटी रुपये खर्च करून शहरे स्मार्ट करण्याचा केंद्राचा हेतू होता. यात केंद्र शासनाकडून ५०० कोटी तर राज्य व महापालिकांचा प्रत्येकी २५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध केला जाणार होता. तर त्या त्या महापालिकांनी स्व हिस्स्यापोटी २५० कोटी रुपये टाकणे बंधनकारक होते. स्मार्ट सिटी अभियानात छत्रपती संभाजीनगरची निवड झाल्यानंतर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन कंपनी स्थापन करण्यात आली.

## कामगार दिनानिमित्त पुण्यात शिव कामगार सेनेचा भव्य मेळावा उत्साहात संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या औचित्य साधून शिव कामगार सेना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने पुण्यातील शिवसेना भवन येथे भव्य कामगार मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. शिव कामगार सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुधीरभाऊ कुरुमकर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या मेळाव्यात कामगारांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना व सुविधांची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच कामगारांच्या पाल्यांसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला धर्मवीर आनंद दिघे नागरी लाभ कक्षाचे महाराष्ट्र प्रमुख वैभवजी वाघ, शिव कामगार सेनेचे खजिनदार सुनील ढोकळे, सोपान भोसले, विराज डाकवे, राजाभाऊ परदेशी, गणेश तुम्मा, नागेश अडसूळ, युवराज फाळके, अनिल तसेच ऋषिकेश गोसावी आदी पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुंबई-पुणे कनेक्टिव्हिटीसाठी सुरू करण्यात आलेल्या ‘मिसिंग लिंक’ लोकार्पण सोहळ्याचे लाईव्ह स्क्रिनिंगही करण्यात आले, ज्याला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रदेशाध्यक्ष सुधीरभाऊ कुरुमकर यांनी राज्यातील सर्व कामगारांनी संघटनेशी जोडून आपल्या हक्कांसाठी एकत्र येण्याचे आवाहन केले.



# 'भारताची भीमज्योत' बाबासाहेबांचे संविधान मजबूत करणारी

## रामदास आठवले यांचे प्रतिपादन; भाजप अनुसूचित जाती मोर्चाच्या वतीने 'भारताची भीमज्योत' उपक्रम

**पुणे (दै. संध्या) :**

"संविधानाचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने लोहपुरुष, शक्तिपुरुष व द्रष्टे नेते होते. बाबासाहेबांच्या विचारांवर आणि संविधानाच्या तत्वांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्य करीत आहेत. भाजपने सर्व समाजाला सोबत घेऊन 'सबका साथ, सबका विकास' ही भूमिका मांडली असून, बाबासाहेबांचे संविधान मजबूत करण्यासाठी दीक्षाभूमी ते चैत्यभूमी असा प्रवास करत निघालेली ही भीमज्योत अवघ्या विश्वाला प्रकाशाची वाट दाखवेल," असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भाजप अनुसूचित जाती मोर्चा, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने प्रदेशाध्यक्ष विश्वजित अनिलकुमार गायकवाड यांच्या संकल्पनेतून 'भारताची भीमज्योत' दीक्षाभूमी ते चैत्यभूमी, बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारताचा अनुभव देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. गंज पेठेतील सावित्रीबाई फुले स्मारकात झालेल्या या कार्यक्रमावेळी रामदास आठवले बोलत होते. प्रसंगी माजी मंत्री भाई गिरकर, उपमहापौर परशुराम वाडेकर, भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी खासदार सुनील गायकवाड, 'रिपाइं'चे शहराध्यक्ष संजय सोनावणे, नगरसेवक अजय खेडेकर, पल्लवी जावळे, मनीषा लडकत, अमर आवळे, नंदा आबनावे, प्रियांका शेंडगे, अर्चना जगताप, हर्षदा भोसले, वीणा घोष, निलेश आल्हाट यांच्यासह पुणे व पिंपरी-चिंचवड येथील पदाधिकारी उपस्थित होते.

रामदास आठवले म्हणाले, "दलित, सवर्ण व बहुजन समाजाला एकत्र आणण्यासाठी माझा प्रयत्न आहे. बुद्धाचे तत्वज्ञान अंगीकारत बाबासाहेबांनी संपूर्ण मानवजातीचे कल्याण करणारे संविधान देशाला दिले. संविधान कोणीही बदलू



शकत नाही. काँग्रेस आणि विरोधी पक्ष केवळ तशा वावड्या उठवत आहे. मात्र, चैत्यभूमीवर भव्य स्मारक साकारण्यात नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनीच पुढाकार घेतल्याचे आपण पाहिले. विश्वजित गायकवाड यांच्यासारख्या युवकाला पाठबळ देण्याचे काम भाजप करीत आहे. मी ज्यांच्यासोबत असतो, त्यांची सत्ता आल्याशिवाय राहत नाही. जोवर मी भाजपसोबत आहे, तोवर भाजपाची सत्ता येणार असून, मला चौथ्यांदा मंत्री होण्याची संधी मिळणार आहे."

"पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता येणार आहे. ममता बॅनर्जी व अन्य नेत्यांनी पराभव स्वीकारून जिंकून येणाऱ्या भाजपचे अभिनंदन करायला हवे. देशात महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी एनडीए सरकार कटिबद्ध असून, पुढील काळात याबाबत जागृती करून हे विधेयक पारित करू. दलित समाजाची ताकद मोठी असून, कोणाला पडायचे आणि कोणाला निवडून आणायचे, हे माझ्या हातात आहे. काँग्रेसने महिलांना जसा विरोध केला, तसा मलाही केला होता. पंढरपूरमधून खासदार झाल्यावर मंत्री केले नव्हते, तर शिर्डीमध्ये मला जाणूनबुजून पराभूत केले होते, त्यामुळे मी काँग्रेसची साथ सोडून भाजपमध्ये गेलो आणि भाजपाची सत्ता आली," असेही आठवले यांनी नमूद केले.

रामदास आठवले पुढे म्हणाले की, “दलित समाजाला पुढे नेण्याचे काम मी करत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे महान कार्य सुरू केले, त्याच विचारधारेचा वारसा पुढे नेण्याचा माझा प्रयत्न आहे. माझे राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून समाजाच्या उन्नतीसाठी आहे. मी भाजपासोबत आहे असे म्हणण्यापेक्षा भाजपा माझ्यासोबत आहे, असे मी मानतो. कारण माझा केंद्रबिंदू हा नेहमीच समाजहित राहिला आहे. मी कोणत्याही पदासाठी किंवा वैयक्तिक स्वार्थासाठी काम करत नाही, तर वंचित, दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. मी नरेंद्र मोदींसोबत त्यांच्या विचारांमुळे आणि विकासाच्या दृष्टिकोनामुळे आहे. समाजातील सर्व घटकांना मुख्य प्रवाहात आणणे, समान संधी निर्माण करणे आणि देशाला पुढे नेणे, हा आमचा समान उद्देश आहे.”

भाई गिरकर म्हणाले, "बाबासाहेब हे एकच असे महापुरुष आहेत, ज्यांची जयंती दीड महिना जगभर साजरी होते. देश-परदेशात जाऊन त्यांनी ३२ हुन अधिक पदव्या घेत उच्च शिक्षण घेतले. संविधान दिले. आज आपण त्यांनी दाखवलेल्या मार्गावरून चालत आहोत. भाजपाला मोठा जनाधार मिळत असून, संपूर्ण अनुसूचित जातीतला समाज भाजपसोबत आहे. संविधानाला राष्ट्रीय ग्रंथ मानून मोदी काम करत आहेत.

त्यामुळे २०२९ मध्येही भाजपच सत्तेवर येणार आहे. विरोधक चुकीचे नॅरेटिव्ह पसरवत असले, तरीही भाजप हाच देशासाठी योग्य पर्याय आहे."

धीरज घाटे म्हणाले, "अपप्रचार खोडण्यासाठी असे उपक्रम गरजेचे आहेत. बाबासाहेबानी चळवळीला आयुष्य दिले, समाज उभा राहिला, देशाच्या विकासात योगदान दिले. बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाच्या आदर्शांना समोर ठेवून वाटचाल करूया. देशाला प्रगतीच्या शिखरावर घेऊन जाऊया."

# उषा मंगेशकर, हरिहरन, संजीव कपूर, राही भिडे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

**मुंबई (दै. संध्या) :**

ज्येष्ठ पार्श्वगायिका उषा मंगेशकर, गझल तसेच पार्श्वगायक हरिहरन, सेलेब्रिटी शेफ संजीव कपूर, अभिनेत्री सुषमा देशपांडे, ज्येष्ठ पत्रकार राही भिडे व बीड जिल्ह्यात एचआयव्ही एड्सग्रस्त मुलांच्या संगोपन व पुनर्वसनासाठी कार्य करीत असलेले दत्ता बारगजे व संध्या बारगजे यांना आज जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १ मे) मुंबई येथे जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले.

आफ्टरनून व्हॉइस माध्यमातर्फे आयोजित '१८ व्या न्यूजमेकर्स अचिव्हर्स' पुरस्कार सोहळ्याला ज्येष्ठ भरतनाट्यम विदुषी डॉ संध्या पुरेचा, अभिनेते व जाहिरात



क्षेत्रातील तज्ज्ञ भरत दाभोळकर, आफ्टरनून व्हॉईसच्या संपादिका डॉ वैदेही तमन व राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे प्रामुख्याने उपस्थित होते.

विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या लोकांना सन्मानित केल्यास त्यातून समाजाला प्रेरणा मिळते, असे सांगून जीवन गौरव पुरस्कार प्राप्त पुरस्कारार्थींचे योगदान फार मोठे असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना शेफ संजीव कपूर यांनी लोकांना घरचे भोजन नेहमी चांगले असा मूलमंत्र दिला. 'घरच्या भोजनात प्रेम असते तर बाहेरच्या भोजनात व्यवहार असतो' असे त्यांनी सांगितले. पार्श्वगायक हरिहरन यांनी यावेळी 'तू ही रे, तेरे बिना मै कैसे जिऊ' हे गाणे सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

महाराष्ट्राची भूमी प्रगतिशील विचार, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक समृद्धीचे प्रतीक आहे. राज्याला छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा वारसा लाभला आहे. आजही महाराष्ट्र उद्योग, संस्कृती, सुशासन आणि सामाजिक विकास या क्षेत्रांत देशाचे नेतृत्व करत आहे, असे सांगून समाज विविध आव्हानांना सामोरे जात असताना प्रामाणिकपणा, सेवा आणि समर्पण या मूल्यांचे जतन करणे अत्यंत आवश्यक आहे. आज सन्मानित होत असलेले सर्व व्यक्तिमत्त्वे या मूल्यांचे जिवंत उदाहरण आहेत, असे राज्यपालांनी सांगितले.



## मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये 38 वर्षीय रुग्णाला नवजीवन

**पुणे (दै. संध्या) :**

Medicover Hospitals, Bhosari येथे 38 वर्षीय रुग्णाचा जीव वाचवण्यात डॉक्टरांना उल्लेखनीय यश मिळाले आहे. तीव्र हृदयविकाराचा झटका आणि कार्डियाक अरेस्टसारख्या जीवघेण्या स्थितीत असलेल्या या रुग्णावर आपत्कालीन अँजिओप्लास्टी आणि अत्याधुनिक अतिदक्षता उपचारांद्वारे यशस्वी उपचार करण्यात आले.

सुरुवातीला रुग्णावर दुसऱ्या रुग्णालयात उपचार सुरू होते, जिथे कार्डियाक अरेस्टमुळे त्याला सीपीआर आणि डिफिब्रिलेशन देण्यात आले. मात्र, प्रकृती अधिक खालावत जाऊन कार्डिओजेनिक शॉक निर्माण झाल्याने त्याला तातडीने कार्डियाक ॲम्ब्युलन्सद्वारे मेडिकव्हर हॉस्पिटल्स, भोसरी येथे हलवण्यात आले.

रुग्णालयात दाखल होताना रुग्णाची अवस्था अत्यंत गंभीर होती. त्याचा रक्तदाब आणि नाडी मोजता येत नव्हती. तात्काळ व्हेंटिलेटर आणि इनोट्रोपिक सपोर्ट देत उपचार सुरू करण्यात आले.

आपत्कालीन कोरोनरी अँजिओग्राफीमध्ये हृदयाच्या धमनित मोठा रक्ताचा थक्का आढळून आला. त्यानंतर Dr. Prashant Sadashiv Shinde यांच्या नेतृत्वाखालील तज्ज्ञ कार्डिओलॉजी टीमने तातडीने PTCAकरत रक्तप्रवाह पूर्ववत केला.

## डीजेच्या आवाजाला घाबरून २२ बकऱ्या पळाल्या

**गंगापूर (दै. संध्या) :**

लग्नाच्या गडबडीत हरवलेल्या तब्बल २२ बकऱ्या जामगाव येथील नागरिकांनी दिवसभर सांभाळून मूळ मालकाच्या स्वाधीन केल्याची हृदयस्पर्शी घटना घडली आहे. या घटनेतून जामगावकरांचा प्रामाणिकपणा व सामाजिक बांधिलकी पुन्हा अधोरेखित झाली आहे.

कायगाव येथील सीताराम जीवाजी नजन यांच्या शेडमध्ये ठेवलेल्या २२ बकऱ्या २८ एप्रिलच्या रात्री शेजारी सुरू असलेल्या हळदी कार्यक्रमातील डीजेच्या मोठ्या आवाजामुळे घाबरून पळून गेल्या. रात्री उशिरापर्यंत नजन यांनी कायगाव व भेंडाळा परिसरात शोध घेतला; मात्र बकऱ्या सापडल्या नव्हत्या. दरम्यान, २९ एप्रिल रोजी पहाटे साडेपाचच्या सुमारास मॉर्निंग वॉकला गेलेल्या जामगाव येथील काही नागरिकांना बोजवारे वस्तीजवळ या बकऱ्या भटकताना दिसल्या. त्यांच्या मागे कोणीही नसल्याचे लक्षात येताच सुनील ठाकूर, सुनील बोराटे, डॉ. गोरख तुपलोंढे, सुभाष माने, संजय तागड, किरण दांडगे, संजय तुपलोंढे, सचिन काळे, लखन शेळके, दत्तात्रय रोडगे, अशोक तागड व धनू काळे यांनी पुढाकार घेत सर्व बकऱ्या हाकलत जामगाव येथे आणल्या होत्या. मुळ मालकापर्यंत या बकऱ्या पोहचल्या पाहिजे या भावनेतून ग्रामस्थांनी प्रामाणिक प्रयत्न केले.

किरण दांडगे यांच्या शेडमध्ये दिवसभर बकऱ्यांना सुरक्षित ठेवून मालकाचा शोध घेण्यास ग्रामस्थांनी सुरुवात केली. चौकशीअंती या बकऱ्या कायगाव येथील सीताराम नजन यांच्या असल्याचे निष्पन्न झाले. त्यांना तातडीने संपर्क करून बोलावण्यात आले व ओळख पटवून अंदाजे अडीच ते तीन लाख रुपयांच्या बकऱ्या सुरक्षित परत करण्यात आल्या. आपल्या उपजीविकेचा आधार असलेल्या बकऱ्या परत मिळाल्याने सीताराम नजन भावुक झाले.

## महालक्ष्मी सरस मधून १ कोटी लखपती दीदी तयार करण्याचे उद्दिष्ट!

**मुंबई (दै. संध्या) :**

प्रत्येक जिल्ह्यातील महिलेला हक्काच व्यासपीठ देणारे महालक्ष्मी सरस प्रदर्शन आता नव्या रूपात तयार झालं असून, कोणत्याही जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाची स्पर्धा करण्यासाठी ते सज्ज आहे. या प्रदर्शनात केवळ सजावटीसाठी कंटेनर लावलेले नाहीत तर ते कंटेनर ऑफ इंडिया आहेत, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वात आत्तापर्यंत ५० लाख लखपती दीदी तयार झाल्या आहेत, येणाऱ्या काळात १ कोटी लखपती दीदी तयार करण्याचं उद्दिष्ट आहे, असं वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे झालेल्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनाच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते.

महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन २०२६ सोहळ्याचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते पार पडले. ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, मंत्री मंगल प्रभात लोढा, राज्यमंत्री योगेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत व ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे मुख्य सचिव एकनाथ डवले (IAS), मुख्य कार्यकारी अधिकारी उमेद निलेश सागर (IAS), मुख्य परिचालन अधिकारी निखिल ओस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करायचं असेल तर, आपल्या देशातील नारीशक्तीच्या शक्तीचा उपयोग देशाच्या विकासाच्या वाटचालीमध्ये करावा लागेल. ज्या क्षणी ही नारीशक्ती मानव संसाधन म्हणून देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये सहभागी होईल त्या क्षणी भारत विकसित होईल. म्हणूनच मोदीजींनी नारीशक्ती सक्षमीकरणाच्या अनेक योजना या ठिकाणी सुरू केल्या. मला आनंद आहे गेला दहा वर्षात महाराष्ट्रामध्ये उमेद, मवीमच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात महिला बचत गटांची चळवळ उभी राहिली.

# 'सूर्यदत्त' विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कटिबद्ध

## डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन; सूर्यदत्त संस्थेला 'आयएमसी रामकृष्ण बजाज राष्ट्रीय गुणवत्ता पुरस्कार' प्रदान

**पुणे (दै. संध्या) :**

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या संचालित सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड मास कम्युनिकेशन (एसआयएमएमसी) संस्थेला शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी 'आयएमसी रामकृष्ण बजाज नॅशनल क्वालिटी अवॉर्डने (आरबीएनक्यूए) सन्मानित करण्यात आले. संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्ता, सातत्यपूर्ण सुधारणा आणि उत्कृष्ट व्यवस्थापन पद्धतींचा गौरव म्हणून 'सूर्यदत्त'ला ‘कमेंडेशन सर्टिफिकेट’ प्रदान करण्यात आले. मुंबईतील चर्चगेट येथील आयएमसी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीमध्ये या सोहळ्याचे नुकतेच आयोजन केले होते. नोबेल पारितोषिक विजेते डॉ. कैलास सत्यार्थी, जिंदल स्टेनलेस स्टील,



हिसार आणि जीएमआर वरोरा इंजिनिअरिंग लिमिटेड यांचाही या सोहळ्यात गौरव करण्यात आला.

भारताचे माजी क्रिकेटपटू, लिटलमास्टर सुनील गावस्कर यांच्या हस्ते 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा व विभागप्रमुख प्रा. डॉ. मनीषा कुंभार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. 'आयएमसी'च्या अध्यक्षा सुनीता रामनाथकर, आरबीएनक्यूए ट्रस्टचे अध्यक्ष निरज बजाज, या समारंभास डॉ. मेधा देशमुख, डॉ. विवेक स्वामी, डॉ. शीतल भुसारे आणि प्रा. स्मिता चव्हाण यांच्यासह सूर्यदत्ता संस्थेचे अनेक प्राध्यापक उपस्थित होते. राष्ट्रीय स्तरावरील या सन्मानामुळे सूर्यदत्त संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण क्षेत्रातील वाटचालीला नवे बळ मिळाले आहे.

सुनील गावस्कर म्हणाले, "शिस्त, संघभावना आणि सातत्य हे आपल्या जीवनात अतिशय महत्वाचे असते. क्रीडा आणि संस्थात्मक यशात साम्य असून, शिक्षण संस्थांनी गुणवत्ता साध्य करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज असते. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच या गुणांची गोडी लावली, तर जीवनात यशाकडे वाटचाल करणे सोयीचे होते. शिक्षणासह खेळांमध्येही मुलांनी पारंगत व्हावे. खेळामुळे आपले मानसिक, शारीरिक स्वास्थ्य चांगले राहते."

कैलास सत्यार्थी यांनी आपल्या भाषणात गुणवत्ता ही केवळ प्रक्रियांपुरती मर्यादित नसून त्यात मूल्ये, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी यांचाही समावेश असावा, असे सांगितले. तसेच, शिक्षणसंस्थांनी जागतिक पातळीवर जबाबदार नागरिक घडविण्यावर भर द्यावा, असे आवाहन केले.

सूर्यदत्त समूहाच्या वतीने सुनील गावसकर आणि कैलाश सत्यार्थी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, त्यांना सूर्यदत्त कॅम्पसला भेट देण्याचे निमंत्रण देण्यात आले. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी हा प्रतिष्ठित पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करीत संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे, शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शितोळेनगरला 16 तास बत्ती गूल; महावितरणचा भोंगळ कारभार

सांगवी (दैनिक संध्या) : स्मार्ट सिटीतील सांगवी परिसरात वीजपुरवठा सुरू असताना, शितोळेनगर भागाला मात्र महावितरणच्या नाकर्तेपणामुळे 16 तास बत्ती गूल झाल्याने नागरिकांना अंधारात राहण्याची वेळ आली. गेल्या 8 दिवसांपासून सांगवी भागात विजेचा लपंडाव सुरू आहे. भूमिगत केबल नादुरुस्त झाल्याने शितोळेनगर परिसरातील नागरिकांना भर उन्हाळ्यात अंधारात व उकाड्यात राहण्याची वेळ आली. बुधवारी सकाळी 9.30 वाजता गेलेली वीज थेट पहाटे 2 वाजेपर्यंत गायब होती. विशेष म्हणजे, महावितरण मेंटेनन्सच्या नावाखाली ग्राहकांकडून जास्तीचे पैसे घेत असताना प्रत्यक्षात मात्र कामाचा बोजवारा उडाला आहे. नागरिकांनी महावितरणच्या कामावर संताप व्यक्त करताना एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे तो म्हणजे महावितरण प्रत्येक बिलामध्ये किंवा मीटर रीडिंगच्या वेळी मेंटेनन्सच्या नावाखाली 10 ते 20 पैसे आगाऊ रक्कम ग्राहकांकडून वसूल करते. जर प्रत्येक ग्राहकाकडून देखभाल-दुरुस्तीसाठी ही आगाऊ रक्कम घेतली जाते, तर मग गेल्या 10-15 वर्षांपासून या जुन्या केबल का बदलल्या गेल्या नाहीत? हा गोळा झालेला पैसा नक्की कोणाच्या खिशात जातोय? असा सवाल ग्राहक करत आहेत. वीज नसल्याचा फटका पाणीपुरवठ्याला बसला. पाण्याचा दिवस असूनही वीज नसल्याने छतावरील टाक्यांमध्ये पाणी चढवता आले नाही. नागरिकांनी पाणी साठवून ठेवले होते, मात्र मोटर सुरू होत नसल्याने पिण्यापासून ते साध्या वापराच्या पाण्यासाठी नागरिकांचे प्रचंड हाल झाले. अनेक घरांमध्ये टॉयलेटला जाण्यासाठीही पाणी उरले नसल्याने नागरिकांची अवस्था अत्यंत केविलवाणी झाली होती.



### थेरगावला होणाऱ्या भव्य कॅन्सर हॉस्पिटलचा अभिषेक बारणे यांनी घेतला आढावा

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना कर्करोगावर सुलभ आणि परवडणाऱ्या दरात उपचार उपलब्ध करून देण्यासाठी थेरगाव येथे महानगरपालिकेच्या वतीने भव्य कॅन्सर हॉस्पिटल उभारण्यात येत आहे. या हॉस्पिटलच्या उभारणीचा आणि विविध सुविधांचा आढावा घेण्यासाठी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज, ३० एप्रिल रोजी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष कामाची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यादरम्यान अभिषेक बारणे यांनी हॉस्पिटल परिसरातील पार्किंग सुविधा, सुरक्षा व्यवस्था, ऑक्सिजन आणि पाणी पुरवठा यंत्रणा, तसेच स्वच्छतेच्या नियोजनाबाबत अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. रुग्णालयात पुरवल्या जाणाऱ्या संभाव्य आरोग्य सेवांची माहिती घेत असताना त्यांनी कामाचा दर्जा आणि गती याबाबत प्रशासनाला आवश्यक सूचनाही केल्या. यावेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र फिरके, डॉ. मुसलगी, डॉ. सोनेकर, डॉ. कुलकर्णी यांसह पालिकेचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

### महापौर रवि लांडगे यांचा स्वगणनेतून जनगणना 2027 मोहिमेला शुभारंभ

पिंपरी (दैनिक संध्या) : जनगणना २०२७ या महत्त्वाच्या राष्ट्रीय उपक्रमाची महाराष्ट्रात सुरुवात झाली असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी स्वतः ऑनलाइन स्वगणना पूर्ण करून या मोहिमेचा प्रारंभ केला. नागरिकांनीही पुढाकार घेत या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. महापौर रवि लांडगे यांनी https://se.census.gov.in या संकेतस्थळावर भेट देत आवश्यक माहिती भरून स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली. सर्व ३४ प्रश्नांची अचूक माहिती देत त्यांनी नोंदणी केली आणि 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' प्राप्त केला. त्यांच्या या कृतीमुळे नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश पोहोचला आहे. यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले, जनगणना ही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे. अचूक माहितीमुळे शासनाला योग्य नियोजन करता येते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने या उपक्रमात सहभागी व्हावे. १ मे ते १५ मे २०२७ या कालावधीत स्वगणना सुविधा उपलब्ध असून नागरिकांना घरबसल्या ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. याशिवाय, १६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणकांमार्फत घरोघरी भेट देऊन उर्वरित जनगणना प्रक्रिया पार पडणार आहे. तरी अधिकाधिक नागरिकांनी स्वगणना करून सहकार्य करावे, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

# महापालिकेच्या वतीने शिवरायांचा जिवंत इतिहास रंगमंचावर

## महाराष्ट्र दिन तसेच मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित 'जाणता राजा' महानाट्याला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद

पिंपरी (दै. संध्या) :

महाराष्ट्र दिन, जागतिक कामगार दिन आणि मराठी राजभाषा दिन या तिन्ही महत्त्वपूर्ण दिवसांचे औचित्य साधत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'जाणता राजा' या भव्य महानाट्याला नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद खरोखरच अभिमानास्पद आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श नेतृत्व, दूरदृष्टी आणि जनकल्याणकारी विचार या महानाट्याच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडणे आणि याद्वारे समाजाला प्रेरणा देणे हा यामागचा मानस असल्याचे मत महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केले तसेच या भव्य महानाट्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्व नागरिकांचे त्यांनी आभार मानले.

महाराष्ट्र दिन, जागतिक कामगार दिन तसेच मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधत महापालिकेच्या वतीने निगडी प्राधिकरण येथील मदनलाल धिंग्रा मैदान येथे आयोजित करण्यात आलेले 'जाणता राजा' हे भव्य ऐतिहासिक महानाट्य उत्साहात आणि दिमाखात पार पडले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचे प्रभावी सादरीकरण अनुभवण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

यावेळी आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसदस्या शैलजा मोरे, नगरसदस्य अमित गावडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महापौर रवि लांडगे यावेळी म्हणाले, महाराष्ट्र दिन हा आपल्या राज्याच्या अस्मितेचा, इतिहासाचा आणि प्रगतीचा अभिमान बाळगण्याचा दिवस आहे. त्याचप्रमाणे, जागतिक कामगार दिन आपल्याला कष्टकरी वर्गाच्या योगदानाची जाणीव करून देतो. उद्योग, विकास आणि शहरांची उभारणी ही कामगारांच्या अथक परिश्रमांवर उभी आहे. याशिवाय, मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने आपण आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगला पाहिजे. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि विचारांची ओळख असल्याचे त्यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य आपल्याला आदर्श नेतृत्व, दूरदृष्टी आणि जनकल्याणाची प्रेरणा देते. 'जाणता राजा' सारख्या महानाट्याच्या माध्यमातून ही प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचत आहे. आज नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक कलाकृतीला दिलेला प्रतिसाद अभिमानास्पद असल्याचेही महापौर रवि लांडगे यावेळी म्हणाले.

आमदार उमा खापरे यावेळी म्हणाल्या, 'जाणता राजा' या महानाट्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा जिवंत इतिहास अनुभवण्याची संधी आज मिळाली, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. शिवरायांचा पराक्रम, दूरदृष्टी आणि जनकल्याणकारी विचार प्रत्येकाच्या मनात घर करून राहिले आहेत आणि हे महानाट्य त्या प्रेरणेला अधिक दृढ करते. तसेच महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा देताना आपल्या राज्याच्या गौरवशाली परंपरेचा अभिमान बाळगणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. तसेच, जागतिक कामगार दिनानिमित्त कष्टकरी वर्गाला माझा मनःपूर्वक सलाम. पिंपरी-चिंचवड ही कामगारांची नगरी म्हणून ओळखली जाते आणि या शहराच्या विकासात कामगारांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, असेही आमदार उमा खापरे यावेळी म्हणाल्या.

दरम्यान, महाराष्ट्र कीर्ती सोहळा प्रतिष्ठान आयोजित आणि पद्मभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे लिखित व दिग्दर्शित आशिया खंडातील पहिल्या क्रमांकाचे ऐतिहासिक 'जाणता राजा' या महानाट्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाचा भव्य, जिवंत आणि प्रेरणादायी पट उलगडला. शेकडो कलाकार, नेत्रदीपक नेपथ्य, वास्तवदर्शी युद्धदृश्ये, पारंपरिक वेशभूषा आणि प्रभावी प्रकाशयोजना यामुळे हे महानाट्य प्रेक्षकांना इतिहासाचे साक्षीदार बनवले. स्वराज्याची स्थापना, आदर्श शासनव्यवस्था, शौर्य, कर्तृत्व आणि जनकल्याणकारी दृष्टिकोन या सर्व पैलूंना प्रभावीपणे उलगडत 'जाणता राजा' हे केवळ नाट्यप्रयोग न राहता एक संस्कारमंच ठरले.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेतून एप्रिल २०२६ अखेर ३० अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यरत असताना प्रामाणिकपणा व निष्ठेने दिलेल्या सेवा व योगदानामळे संस्थेची भक्कम पायाभरणी झाली असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले व त्यांचेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

महानगरपालिकेच्या वतीने आयोजित सन्मान समारंभात माहे एप्रिल २०२६ अखेर नियत वयोमानानुसार तसेच स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत मधुकर पवळे सभागृहात उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला त्यावेळी त्या बोलत होत्या.



या कार्यक्रमास सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, नगरसेवक कुशाग्र कदम, उत्तम केंदळे, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी-कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते. शर्मिला बाबर म्हणाल्या, 'आज सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी, कर्मचारी यांनी महापालिकेत उत्कृष्ट सेवा बजावत आपली जबाबदारी पार पाडली आहे. सेवानिवृत्तीनंतर या अधिकारी-कर्मचाऱ्यांना कुटुंबीयांनी सन्मानपूर्वक वागणूक द्यावी. तसेच सेवानिवृत्तीनंतरचा काळ हा नव्या संधींचा असल्याने समाजकार्यात सक्रिय सहभाग घेऊन आनंदी व समाधानकारक आयुष्य जगावे, असे देखील त्या म्हणाल्या.

"सेवानिवृत्ती ही केवळ कागदावर असते, मनाची नसते" या भावनेतून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आजवर जपलेली लोकसेवा आणि कर्तव्यनिष्ठा यापुढेही सुरू ठेवावी,शहराच्या विकास प्रक्रियेत मार्गदर्शक म्हणून सहभाग नोंदवावा आणि आपल्या अनुभवाचा लाभ नव्या पिढीला करून द्यावा असे सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे म्हणाले.

एप्रिल २०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्यांमध्ये कार्यकारी अभियंता सुनील वाघमारे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ.राजेंद्र फिरके, मुख्याध्यापक (प्राथमिक शिक्षण) जयमाला गावडे, चंदा काकडे, सिस्टर इन्चार्ज रोहिणी काकडे, मुख्य लिपिक प्रकाश बाणेकर, राजकुमार यादव, मुरगू बोटे, माया गिते, उपशिक्षक सुनिता इंगळे, फार्मासिस्ट मिलिंद पंडित, सांख्यिकी सहाय्यक प्रशांत उमराणी, वाहन चालक विलास ढोरे, रखवालदार गुलाब हिले, शिपाई विजय कदम, मजूर राजू कुटे, सुरेश देवकर, भिमाजी देवकर, सफाई कामगार पुष्पा ओव्हाळ, रामलिंग गायकवाड यांचा समावेश आहे.

तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांत कार्यकारी अभियंता राजेंद्र मोराणकर, स्टाफनर्स मंगल डफळ, मुकादम सुनील माने, प्रविण डोळस, सफाई कामगार शाम मासरे, कांता शितोळे, मच्छिंद्र सोनवणे, सफाई सेवक महंमद कादर, तुकाराम गोफणे, दीपक उबाळे यांचा समावेश आहे.

## नॉव्हेल इंटरनॅशनल स्कूल मध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

पिंपरी (दै. संध्या) :

चिंचवड येथील नॉव्हेल इंटरनॅशनल स्कूल मध्ये १ मे रोजी महाराष्ट्र दिन अत्यंत उत्साहात, जल्लोषात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर सर्वांनी एकत्रितपणे महाराष्ट्र गीत आणि राज्यागीत सादर करून वातावरण देशभक्तीमय केले.

यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक गणेश नृत्याने कार्यक्रमाची रंगत वाढवली. या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी लेझीम, सिलंबम आणि बरची या पारंपरिक कलांचे देखणे व शिस्तबद्ध प्रदर्शनही सादर केले. या माध्यमातून महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची सुंदर झलक पाहायला मिळाली.

कार्यक्रमात काही विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती आणि परंपरा यावर प्रभावी भाषणे सादर केली. तसेच सामूहिक गीतांचेही सादरीकरण करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांनी जोरदार 'शिवगर्जना' देत संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने दणाणून सोडला. शाळेचे संस्थापक अध्यक्ष माननीय आमदार श्री. अमित गोरखे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम व संस्कृतीबद्दल आदर वृद्धिंगत होतो, असे मत व्यक्त केले. तसेच मराठी भाषा व मराठी संस्कृती जपली पाहिजे असा संदेश सर्व उपस्थितांना दिला. या कार्यक्रमास आमदार श्री. अमित गोरखे, विलास जेऊरकर, डॉ. प्रिया गोरखे, समीर जेऊरकर, शाळेचे विश्वस्त अमोल गोरखे आणि सौ. गायत्री गोरखे, नगरसेविका अनुराधा गोरखे, शाळेच्या मुख्याध्यापिका मृदुला गायकवाड तसेच विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निगडी-चाकण मेट्रोचा नवा डीपीआर; सुधारित आराखड्यामुळे प्रकल्पाचा खर्च २५०० कोटींनी वाढणार

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड शहराच्या वाहतूक व्यवस्थेत मैलाचा दगड ठरणाऱ्या निगडी ते चाकण मेट्रो प्रकल्पाचा सुधारित आराखडा (डीपीआर) तयार झाला आहे. लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या सूचनांनुसार महामेट्रोने या मार्गात मोठे बदल केले असून, आता हा मार्ग भोसरी गावातून जाणार आहे. मात्र, या बदलामुळे प्रकल्पाचा खर्च तब्बल २,५०० कोटी रुपयांनी वाढला असून, भोसरीतील राजमाता जिजाऊ उड्डाणपुलासह इतर काही बांधकामे पाडावी लागणार आहेत.

सुधारित आराखड्यानुसार, निगडी ते चाकण या ४७.२ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गासाठी आता १२ हजार ९३७ कोटी २३ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. पूर्वी हा खर्च १० हजार ३८३ कोटी ८९ लाख रुपये होता. मार्गातील बदल आणि स्थानकांच्या संख्येत झालेली वाढ यामुळे हा खर्च सुमारे २,५०० कोटींनी वाढला आहे. या मार्गावर पूर्वी ३१ स्थानके होती, ती आता ३४ करण्यात आली आहेत.

मेट्रोचा नवा मार्ग भोसरी गावातून नेण्यासाठी पुणे-नाशिक महामार्गावरील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल पाडणे आवश्यक असल्याचे महामेट्रोने स्पष्ट केले आहे. २०११ मध्ये पालिकेने सुमारे १०० कोटी खर्चून हा पूल बांधला होता. त्यासोबतच सात कोटींचा शीतलबाग स्कायवॉक आणि ३८ कोटींचे अर्बन स्ट्रीटचे कामही मेट्रोसाठी पाडावे लागणार आहे. यामुळे करदात्या नागरिकांचे सुमारे १४० कोटी रुपये पाण्यात जाणार असल्याची चर्चा शहरात सुरू झाली आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यानंतर हा आराखडा राज्य व केंद्र सरकारकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवला जाईल आणि त्यानंतरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल.

नाशिक फाट्यावरून ही मेट्रो वल्लभनगर, टेल्को रस्ता, लांडेवाडी आणि भोसरी गावातून पुढे चाकणकडे वळवण्यात आली आहे. हा मार्ग निगडी (भक्ती-शक्ती चौक), रावेत, पुनावळे, ताथवडे, वाकड, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, नाशिक फाटा, गवळीमाथा, मोशी ते चाकण या महत्त्वाच्या भागांना जोडणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात दररोज सुमारे ३ लाख ३२ हजार प्रवासी या मेट्रोने प्रवास करू शकतील, अशी या मार्गाची क्षमता असेल.

## आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांचा पुढाकार; स्वगणनेतून जनगणना मोहिमेला केली सुरुवात

पिंपरी (दै. संध्या) :

राष्ट्रीय जनगणना २०२७ प्रक्रियेला आजपासून महाराष्ट्रात औपचारिक सुरुवात झाली असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्वतः स्वगणना करून या उपक्रमाचा शुभारंभ केला. तसेच या जनगणनेसाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.



पिंपरी चिंचवड महापालिका मुख्यालय येथे १ मे महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या शासकीय ध्वजारोहण सोहळ्यानंतर आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी जनगणनेशी संबंधित https://se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन सर्व ३४ प्रश्नांची माहिती ऑनलाइन भरत स्वगणना जनगणनेची प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर त्यांना 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' प्राप्त झाला. स्वतः पुढाकार घेत स्वगणना करून त्यांनी नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ.विजय सूर्यवंशी म्हणाले की, जनगणना ही केवळ आकडेवारी नसून ती देशाच्या विकासाचा पाया आहे. प्रत्येक नागरिकाने अचूक व प्रामाणिक माहिती देऊन या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे. स्वगणना ही सोपी, सुरक्षित आणि वेळ वाचवणारी प्रक्रिया आहे.

१ मे ते १५ मे २०२७ या कालावधीत नागरिकांना घरबसल्या स्वगणना करण्याची सुविधा उपलब्ध असून, त्यानंतर १६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणकांमार्फत घरोघरी जाऊन जनगणना प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. या मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन अचूक माहिती द्यावी, असे आवाहन देखील आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.

# 'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा' ही महाराष्ट्राच्या जिद्दीची, आत्मविश्वासाची ओळख; महापौर

पिंपरी (दै. संध्या) :

'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा' ही केवळ ओळ नाही, तर महाराष्ट्राच्या जिद्दीची, संघर्षशीलतेची आणि आत्मविश्वासाची ओळख आहे. या भूमीने प्रतिकूलतेतही उभे राहण्याची तसेच विकास घडवण्याची प्रेरणा दिली. आज महाराष्ट्राच्या स्थापना दिनानिमित्त, आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त तसेच मराठी राजभाषा दिनानिमित्त आपण या समृद्ध परंपरेला वंदन करत असताना, कष्टकरी हातांच्या योगदानाबरोबरच आपल्या मराठी भाषेच्या अभिमानाची जाणीव अधिक दृढ होते. हीच भाषा आपल्या संस्कृतीची ओळख, विचारांची ताकद आणि महाराष्ट्राच्या अस्मितेचा कणा आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६६ वा वर्धापन दिन तसेच कामगार दिन आणि मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनाच्या प्रांगणात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते ध्वजारोहन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी शहरवासीयांना महाराष्ट्र दिन, कामगार दिन तसेच मराठी राजभाषा दिनाच्या शुभेच्छा देताना ते बोलत होते. यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर यांच्यासह नगरसदस्य डॉ. सुहास कांबळे, निलेश तरस, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सह शहर अभियंता सुनील बागवानी, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, उप आयुक्त



पंकज पाटील, संदीप खोत, अण्णा बोदडे, ममता शिंदे, प्रदीप ठेंगल, व्यंकटेश दुर्वास, चेतना केरुरे,अतुल पाटील,सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, क्षेत्रीय अधिकारी राजाराम सरगर, कार्यकारी अभियंता सुनील पवार, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे विशेष अधिकारी किरण गायकवाड, अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल तसेच नागरिक उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले, पिंपरी चिंचवड ही केवळ शहर नाही, तर ते भक्ती-शक्ती, पराक्रम आणि श्रम यांच्या संगमातून घडलेली ओळख आहे. भक्ती शक्ती समूहशिल्पातून प्रकट होणारी प्रेरणा, मोरया गोसावींच्या पावन स्मृती, तसेच संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी तसेच चिंचवड येथील चापेकर बंधूंचे स्मारक आणि त्यांचा ऐतिहासिक वाडा हा स्वातंत्र्यलढ्यातील त्याग, शौर्य आणि क्रांतीची जाज्वल्य साक्ष आहे. हजारो कामगारांच्या कष्टातून उभी राहिलेली औद्योगिक नगरी ही या शहराची खरी ताकद आहे, जिथे प्रत्येक कारखान्यात आणि प्रत्येक कष्टकरी हातात महाराष्ट्राच्या प्रगतीची धडधड जाणवते.

या समृद्ध परंपरेचा वारसा जपत, पिंपरी चिंचवड शहराला अधिक सक्षम, समृद्ध आणि सर्वसमावेशक बनवण्याचा आपला संकल्प अधिक दृढ आहे. कामगारांच्या कष्टाला सन्मान देत, विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर सामान्य नागरिक केंद्रस्थानी ठेवून पुढे जाणे, हाच खरा महाराष्ट्राच्या स्थापनेचा आणि या भूमीच्या विचारांचा सन्मान ठरेल, असे देखील महापौर रवि लांडगे यावेळी म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सुरेशभाऊ गोरे कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन दिमाखात साजरा

चाकण (दैनिक संध्या) : येथील स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मिडीयम स्कुल व स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज मध्ये महाराष्ट्र दिन व कामगार दिन मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. उद्योजक नकुल शिवाजी पाटील यांच्या हस्ते व चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्या अध्यक्षतेखाली ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, उपाध्यक्ष राजेंद्र गोरे, संचालक विष्णू गोरे, अंकुश पवार, निलेश संभूस, ओंकार गोरे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, पर्यवेक्षक सविता कुमकर, प्रेरणा काळे, ज्योती अनाप, अंकुश बोऱ्हाडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य निर्मिती साठी हौतात्म्य पत्करलेल्या शूरविरांना अभिवादन करण्यात आले. त्याचप्रमाणे शाळेत शंभर टक्के उपस्थित असल्याबद्दल प्रतिक रविंद्र सैदाने, जान्हवी जनाभाऊ वाळुंज व दिव्या दैवान कदम यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. नकुल पाटील, मनिषा गोरे व विकास गोरे आदींनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी यावेळी राष्ट्रगीत, राज्यगीत गायले. स्काऊट गाईडच्या पथकाने मानवंदना दिली. प्राचार्या प्रमिला गोरे यांनी प्रास्ताविक केले. दत्तात्रय लिंभोरे यांनी सूत्रसंचालन करून सर्वांचे आभार मानले.

### लेण्याद्री स्वतंत्र करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी केले रद्द

नारायणगाव (दैनिक संध्या) : लेण्याद्री येथील स्वतंत्र महसुली गाव करण्याचा मागील आदेश रद्द करण्यात आला असून,2 एप्रिल 2025 रोजी काढण्यात आलेली ही अंतिम अधिसूचना रद्द करण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले असून, या निर्णयामुळे लेण्याद्री गाव पुन्हा मूळ गोळेगाव ग्रामपंचायतीच्या अंतर्गत करण्यात आले आहे. अष्टविनायकांपैकी लेण्याद्री देवस्थान हे पूर्वापार गोळेगाव महसुली गावात समाविष्ट आहे. गाव नकाशा, नैसर्गिक हद्दी आणि रस्ते यांसारख्या तांत्रिक बाबींचा विचार करता हे देवस्थान गोळेगाव मध्येच ठेवण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली होती. या विषयावर गोळेगावचे राजेंद्र बिडवई, संजय ढेकणे, शंकर ताम्हाणे, भगवान हांडे आणि इतर सहकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात दाद मागितली होती. यावर झालेल्या सुनावणीनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी अंतिम अधिसूचनेत बदल करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करत जुना आदेश रद्द केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी आता उपविभागीय अधिकारी जुन्नर यांना सर्व बाबींचा पुनर्विचार करून नवीन सुधारित प्रस्ताव आणि महसुली गाव निर्मितीची अंतिम अधिसूचना सादर करण्याचे आदेश दिले आहेत.या निर्णयाचा फायदा लेण्याद्री धार्मिक स्थळाच्या प्रशासकीय एकत्रीकरणासाठी आणि विकासासाठी होणे अपेक्षित आहे.



### ड्रेनिज सांडपाणी सोडल्याने नागरिकाच्या आरोग्याला धोका; उपोषणला सुरवात

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : एक मे महाराष्ट्र दिनाच्या दिवशी पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील मुळा मुठा नदीत केमिकल युक्त ड्रेनिज सांडपाणी सोडल्याने नागरिकाच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्यामुळे तसेच पशुधन जनावरे याच्या जिवालाही धोका निर्माण झाल्यामुळे जिल्हा आरोग्य अधिकारी, संचालक कृष्णा खोरे सिंचन भवन पुणे, आयुक्त पुणे महानगर पालिका, आयुक्त पिंपरी चिंचवड महानगर पालिका, जिल्हाधिकारी पुणे, विभागीय आयुक्त पुणे, आरोग्यमंत्री महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई यांच्याकडे 16 एप्रिल 2026 रोजी संबंधित विभागाला निवेदन देण्यात आले होते. त्यानुसार नदीकाठचा नागरिकांनी जलपर्णी बसून आमरण उपोषणाला सुरवात केली आहे. सदर प्रसंगी अनेक गावच्या प्रतिनिधींनी या उपोषणाला पाठिंबा दिला आहे. तसेच शासनाने तातडीने योग्य न्याय देण्यासाठी पाऊले उचलावी. जोपर्यंत शासन स्थरावर या विषयाचा निर्णय घेतला जात नाही, तोपर्यंत आमरण उपोषण चालू ठेवण्याचा निर्धार योक्त केला उपोषण वाल्यांनी केला आहे.

### श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवडच्या शाळांचा बारावी परीक्षेत झेंडा

सासवड (दैनिक संध्या) : श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित विविध विद्यालयांनी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२६ मध्ये दैदीप्यमान यश संपादन केले आहे. संस्थेचा एकूण सरासरी निकाल ९८.७४ टक्के लागला असून, अनेक विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. संस्थेच्या चार शाखांतील परिक्षा दिलेल्या एकूण ३९७ विद्यार्थांपैकी ३९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या परीक्षेमध्ये शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूलची कु. जगताप श्रेया दिपक हिने ९० टक्के गुण मिळवून संस्थेच्या सर्व विद्यालयांमध्ये प्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, मार्गदर्शक सनदी अधिकारी डॉ. राजेंद्रबापू जगताप, सचिव माजी आमदार संजय जगताप, सहसचिव दत्तात्रय गवळी, व्यवस्थापक कानिफनाथ आमराळे, विश्वस्त आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

### जेजुरीच्या होळकर तलावात आढळले अनोळखी व्यक्तीचे प्रेत

जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी येथील ऐतिहासिक होळकर तलावात एका अनोळखी व्यक्तीचे प्रेत जेजुरी पोलिसांना आढळून आले. जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की जेजुरी येथील होळकर तलावात शुक्रवार दिनांक 1मे रोजी अनोळखी 40 वर्षे वयाच्या पुरुषाचे प्रेत आढळून आले. सदर मयताचे वय अंदाजे 40 वर्षे असून अंगाने सडपातळ, उंची पाच फूट, वर्ण निमगोरा असून विवस्त्र अवस्थेत या व्यक्तीचे प्रेत आढळून आले आहे. सदर अनोळखी व्यक्ती संदर्भात कोणाला माहिती असल्यास जेजुरी पोलीस स्टेशन शी संपर्क साधावा असे आवाहन जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी केले आहे.

# चाकणला भटकी कुत्री नियंत्रणासाठी डॉग केचिंग व्हेईकलचे लोकार्पण

चाकण (दै. संध्या)




चाकण नगरपरिषदेच्या वतीने भटकी कुत्री नियंत्रणासाठी डॉग केचिंग व्हेईकलचे लोकार्पण करण्यात आले. वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या संख्येमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत असून, याबाबत लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांकडून सातत्याने मागणी करण्यात येत होती. त्या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेकडून हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषा सुरेशभाऊ गोरे यांच्या हस्ते या वेहिकलचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, नगरसेवक मंगेश कांडगे, नगरसेविका रूपाली कांडगे, जयश्री नायकवाडी आदींसह नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व सेवक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या नव्या वाहनाच्या माध्यमातून शहरातील भटक्या कुत्र्यांचे शास्त्रीय पद्धतीने पकडणे, त्यांचे लसीकरण, निर्बिजीकरण व पुनर्वसन या प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहेत. चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यावेळी म्हणाले की," या वाहनाच्या मदतीने भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत होणार असून, नागरिकांनीही या उपक्रमास सहकार्य करावे.

चाकण नगरपरिषद नागरिकांच्या हितासाठी विविध लोकाभिमुख उपक्रम सातत्याने राबवत असून, भविष्यातही अशा सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा माणस राहील."

> चाकण शहर स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी बनविण्यासाठी नगरपरिषद कटिबद्ध राहणार आहे. सामाजिक उपक्रमांमुळे नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल.
> - मनीषा गोरे, नगराध्यक्षा, चाकण.

## 'माऊली वारीयर्स'ची विजयी गर्जना; थरारक अंतिम सामन्यात स्वरांश ११ वर मात

आळंदी (दै. संध्या)

शहरात रंगलेल्या अधिरा करंडक क्रिकेट स्पर्धेत 'माऊली वारीयर्स'ने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले.

विरोधीपक्ष नेते आदित्य घुंडरे, नगरसेविका ऋतुजा घुंडरे व कैवल्य एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष मयुर घुंडरे यांच्या पुढाकारातून आयोजित क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात माऊली वारीयर्सने स्वरांश ११ संघावर मात करत करंडकावर आपले नाव कोरले. रंगतदार आणि रोमहर्षक झालेल्या या सामन्याने प्रेक्षकांची उत्सुकता शेवटच्या क्षणापर्यंत टिकवून ठेवली.

स्पर्धेत एकूण आठ संघांनी सहभाग नोंदविला होता. सुरुवातीपासूनच सामने अत्यंत चुरशीचे झाले. स्वरांश ११ ने माऊली वारीयर्सवर विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. तर बाद फेरीत सरपंच ११ ने रघुनाथ महाराज प्रतिष्ठानवर मात केली. पुढील लढतीत माऊली वारीयर्सने सरपंच ११ ला पराभूत करत अंतिम फेरी गाठली.

बक्षीस वितरण समारंभ नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, माजी नगराध्यक्ष राहुल चिताळकर, रोहीदास तापकीर, डि.डि. भोसले, प्रकाश कुऱ्हाडे, आनंद मुंगसे, नगरसेवक सागर कुऱ्हाडे, संदीप रासकर, सुरेश झोंबाडे, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर, डॉ.राम गावडे आदी मान्यवरांच्या हस्ते पार पडला.

दरम्यान, स्पर्धेचे विशेष आकर्षण ठरलेल्या प्रदर्शनीय सामन्यात मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या नेतृत्वाखालील आळंदी नगरपरिषद संघाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमाजी नरके यांच्या नेतृत्वाखालील आळंदी पोलीस स्टेशन संघावर विजय मिळवत उपस्थितांची दाद मिळवली.

# एस.आय.आर प्रक्रियेस खेड तालुक्यात ५२ टक्के नागरिकांचा प्रतिसाद

## उर्वरित नागरिकांनी मॅपिंग करून घेण्याचे प्रांताधिकारी अनिल दौंडे यांचे आवाहन

राजगुरुनगर (दै. संध्या)

भारतीय निवडणूक आयोगातर्फे राबविण्यात येत असलेल्या एस.आय.आर उपक्रमाला खेड तालुक्यातील ५२ टक्के नागरिकांनी मॅपिंग केली असल्याची माहिती प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी दिली.

बेलो (केंद्रस्तरीय मतदार अधिकारी) मार्फत करण्यात येत असलेल्या एस.आय.आर ( विशेष सखोल पूर्णतापसणी) पूर्व तयारी सुरू झाली असून प्रत्यक्ष अंमलबजावणी जून महिन्यामध्ये होणार असल्याचे दौंडे यांनी स्पष्ट केले.

एस.आय.आर अंतर्गत २००२ मधील मतदार यादीतील नावांची २०२४ मधील नावांशी सांगड घालून मॅपिंग केले जात आहे. ज्या व्यक्तींची नावे २००२ च्या यादीत नसतील, त्यांना 'प्रोजेनी' म्हणून पालकांचा पुरावा सादर करावा लागणार आहे. या प्रक्रियेमुळे मतदार यादीतील दुबार नावे, मृत व्यक्तींची नावे कमी होऊन नवीन पात्र मतदारांची नावे समाविष्ट होण्यास मदत होणार आहे, परिणामी मतदार यादी अधिक अचूक व पारदर्शक होईल.

मात्र, ज्यांचे मॅपिंग झालेले नाही त्यांनी शासनाने निश्चित केलेले रहिवासी पुरावे सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचे नाव मतदार यादीतून वगळले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.



मतदार यादीतील शुद्धीकरणासाठी निवडणूक आयोग मार्फत राबविल्या जाणाऱ्या या प्रक्रियेवर मॅपिंग करून घेण्यासाठी शासनाने शाळेतील शिक्षक,नगरपरिषद कर्मचारी, कृषी अधिकारी, महसूल अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी यांची नेमणूक करून त्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले होते.तरीही एस.आय.आर प्रक्रिया किचकट आणि या प्रक्रियेवर नेमलेल्या केंद्रस्तरीय मतदार अधिकारी अर्थात बेलो यांना डोकेदुखी झाल्याने स्थानिक नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते यांच्या मदतीने ही प्रक्रिया संथगतीने राबविताना केंद्रस्तरीय मतदार अधिकारी(बेलो) दिसत आहे.

या प्रक्रियेसाठी शिक्षक, नगरपरिषद कर्मचारी, कृषी व महसूल विभागातील अधिकारी तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तरीही प्रक्रिया काहीशी किचकट असल्याने आणि बेलो अधिकाऱ्यांवर ताण वाढल्याने काम संथगतीने सुरू असल्याचे दिसून येत आहे. स्थानिक नगरसेवक व सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने ही मोहीम पुढे नेली जात आहे.

खेड तालुक्यातील सुमारे साडेतीन लाख मतदारांपैकी केवळ ५२ टक्के नागरिकांनी मॅपिंग पूर्ण केले असून उर्वरित नागरिकांनी लवकरात लवकर पुढे येऊन किंवा संबंधित बेलो अधिकाऱ्यांशी संपर्क साधून प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी केले आहे. तसेच या उपक्रमाबाबत अधिक जनजागृती करण्याची गरजही व्यक्त होत आहे.

## माहूर विद्यालयाचा ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार: शैक्षणिक गुणवत्तेत उल्लेखनीय यश

काळदरी (दै. संध्या)




श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचालित माहूर माध्यमिक विद्यालय, माहूर ता.पुरंदर जि पुणे या विद्यालयाचा सन -2025 -2026 शैक्षणिक गुणवत्ता अभियानांतर्गत विद्यालयाने जिल्हास्तरावर द्वितीय तर तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या अभिमानास्पद कामगिरीबद्दल ग्रामस्थांच्या वतीने विद्यालयाचा विशेष सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी माहूर गावचे इनामदार तथा जिल्हा परिषद सदस्य बबुसाहेब माहूरकर, गावच्या प्रथम नागरिक पुनम तुषार माहूरकर, सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक तुषारशेठ माहूरकर, माजी सरपंच तुषार जगताप, शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष सोमनाथ जगताप , ग्रामसेवक शशांक सावंत, गावचे तलाठी, स्विकार कुंभार, योगेश जगताप, सुशिल चव्हाण, राजाराम खोमणे, संघर्ष प्रतिष्ठान चे सदस्य इ. या प्रसंगी ग्रामस्थ, पालक, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यालयाच्या मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षकांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे सर्वांनी कौतुक केले.

ग्रामस्थांनी आपल्या मनोगतात विद्यालयाच्या सातत्यपूर्ण प्रगतीबद्दल आनंद व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापकांनीही या यशाचे श्रेय शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांच्या एकत्रित प्रयत्नांना दिले.

या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यालय भविष्यातही अशीच उज्ज्वल कामगिरी करेल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला. विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पवार, इंद्रभान पठारे, लता गायकवाड, महेंद्र भोसले, रामप्रभू पेटकर, विकास राऊत, रामचंद्र जगताप, रामभाऊ कुंभार, श्रीकांत खोमणे, मंगल जगताप, जीवन कड व श्रीकांत गव्हाणे यासर्वांचा ग्रामपंचायत माहूर व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार आयोजीत केला होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महेंद्र भोसले यांनी तर आभार पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष रामप्रभू पेटकर यांनी मानले.

## तक्रार निवारणासाठी मोबाईल ॲप सुरू; चाकण नगरपरिषदेचा नागरिकाभिमुख उपक्रम

चाकण (दै. संध्या)




चाकण नगरपरिषदेच्या वतीने नागरिकांसाठी अनोख्या पद्धतीने नागरिकाभिमुख उपक्रम राबविण्यात येत असून, तक्रार निवारणासाठी अत्याधुनिक मोबाईल ॲप सुरू करण्यात आले आहे.

चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषा गोरे यांच्या हस्ते या ॲपचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, बांधकाम समितीचे सभापती रणजीत जरे, आरोग्य समितीचे सभापती मंगेश कांडगे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रूपाली कांडगे, नगरसेविका आरती परदेशी, जयश्री नायकवाडी, साधना गोरे, पुनम शेवकरी, तृप्ती जगनाडे, शशिकांत जाधव आदी उपस्थित होते. चाकण शहरातील नागरी समस्या त्वरित, पारदर्शक व प्रभावी पद्धतीने सोडविण्याच्या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे.

नगरअभियंता संतोष गायकवाड यांनी मोबाईल ॲप बद्दल सांगितले की," या मोबाईल ॲपच्या माध्यमातून नागरिकांना पाणीपुरवठा, सांडपाणी, रस्ते, स्वच्छता, स्ट्रीट लाइट, कचरा व्यवस्थापन आदी विविध नागरी समस्यांबाबत थेट तक्रार नोंदविता येणार आहे. तक्रार नोंदविताना संबंधित समस्येचे छायाचित्र अपलोड करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्राप्त तक्रारी तात्काळ संबंधित विभागांकडे वर्ग करण्यात येणार असून, त्यावर निश्चित कालमर्यादेत कार्यवाही केली जाईल. तसेच नागरिकांना त्यांच्या तक्रारीची सद्यस्थिती स्टेटस ॲपवर पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे."

"माय चाकण" या नावाने हे ॲप प्ले स्टोअरवर उपलब्ध असून, व्हाट्सअप चॅट बॉटच्या माध्यमातूनही नागरिकांना आपल्या तक्रारी नोंदविता येणार आहेत.

मोबाईल ॲपच्या माध्यमातून ज्यावेळी नागरिक तक्रार करतील, त्याचवेळी प्रभागातील नगरसेवकांना सदर तक्रार दिसणार आहे. त्यामुळे त्यांनाही सदर तक्रारीचे निवारण करण्यासाठी पाठपुरावा करता येणार आहे. या अभिनव उपक्रमामुळे नागरिकांना नगरपरिषद कार्यालयात येण्याची गरज कमी होणार असून, प्रशासन अधिक उत्तरदायी व कार्यक्षम बनण्यास मदत होणार आहे."

# जेजुरीतील जिजामाता विद्यालयाची उत्कृष्ट यशाची सुवर्ण नोंद

## तृप्ती खळदकर 89.67 टक्के गुणांसह विद्यालयात प्रथम

जेजुरी (दै. संध्या)

जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी या विद्यालयाने इयत्ता बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करत विज्ञान व वाणिज्य शाखेतील शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा यंदाही कायम राखली आहे.

विज्ञान व वाणिज्य या दोन्ही शाखांमध्ये 100 टक्के निकाल लागल्याने विद्यालयाच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि पालकांचा भक्कम पाठिंबा यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

विज्ञान शाखेत खैरे दिक्षा संपत हिने 88 टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. टेकवडे उर्वशी शरद (72.33%) हिने द्वितीय, तर विभाड साक्षी मोहन (71.17%) हिने तृतीय क्रमांक मिळवला.

वाणिज्य शाखेत खळदकर तृप्ती गणेश हिने 89.67 टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. जगताप धनश्री पोपट (84.50%) द्वितीय, तर गरुड चेतन नरसिंग (78.33%) तृतीय क्रमांकावर राहिला.

कला शाखेत माने ज्ञानेश्वरी मल्हारी हिने 82.17 टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. माने सानिका काकासो (80.50%) द्वितीय, तर ताडे श्रावणी श्याम (80.33%) हिने तृतीय क्रमांक पटकावला.

या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य श्री नंदकुमार सागर यांनी समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. "परिश्रम, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन यशाची हमी देतात," असे ते म्हणाले.

या यशामागील खरे शिल्पकार म्हणून सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड या संस्थेचे अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पश्चिम महाराष्ट्र भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस व संस्थेचे सचिव, माजी आमदार संजयजी चंदूकाका जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. एम. एस. जाधव, सहसचिव दत्तात्रय गवळी, संस्थेच्या समन्वयिका सोनालीताई शिंदे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा वं संस्थेच्या विश्वस्त सौ. राजवर्धनीताई जगताप,भारती विद्यापीठाच्या संचालिका व संस्थेच्या विश्वस्त डॉ. अस्मिताताई जगताप, व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे व रवींद्र पंत जगताप यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.



यशस्वी विद्यार्थ्यांना ज्युनिअर विभाग प्रमुख किरण मोडक, शोभा शिंदे, मधुसूदन जगताप, पांडुरंग भांड, संदीप भोंग, जयसिंग वसावे, सचिन निकुडे, पूनम बाठे, अमोल राणे, श्वेतांबर बेलसरे,वैष्णवी पवार, सुरेश शिंदे, सोनाली कोसे यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यालयातील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. पुरंदर तालुक्याचा इयत्ता बारावीचा निकाल 92.06 टक्के लागला आहे.

पुरंदर तालुक्यामध्ये इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी 2388 विद्यार्थ्यांनी फॉर्म भरले होते, परीक्षेसाठी 2358 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते,विशेष प्राविण्यश्रेणीमध्ये 93 विद्यार्थी,प्रथम श्रेणीमध्ये 387 विद्यार्थी, द्वितीय श्रेणीमध्ये 1296 विद्यार्थी व पास श्रेणीमध्ये 395 विद्यार्थी एकूण 2171 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे तालुक्यातील सर्व मान्यवरांकडून हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवरांचे हुतात्म्यांना अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्राच्या 67 व्या स्थापना दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हुतात्मा चौक येथे हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. महाराष्ट्र ही जगातील 30 व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असल्याचे सांगून हुतात्म्यांच्या बलिदानातून घडलेला महाराष्ट्र आज देशाच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' असल्याची भावना मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल आदी यावेळी उपस्थित होते. 'दिल्लीचेही तख्त राखितो महाराष्ट्र माझा' या महाराष्ट्र गीतातील ओळींचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याच्या ऐतिहासिक योगदानाची आठवण करून दिली. महाराष्ट्र दिन हा प्रत्येकासाठी अभिमानाचा आणि प्रेरणेचा दिवस असल्याचे त्यांनी सांगितले. कामगार दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कामगारांना शुभेच्छा दिल्या. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा उल्लेख करत 'पृथ्वी शेषनागाच्या डोक्यावर नाही, तर कामगाराच्या तळहातावर असते,' असे सांगून कामगारांच्या योगदानाचे त्यांनी कौतुक केले. राज्याच्या तसेच देशाच्या प्रगतीत कामगारांचा मोठा वाटा असून त्यांच्या श्रमांमुळेच संपन्नतेची उभारणी झाली आहे, असे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व कामगारांना अभिवादन केले.

### संगीता ढेरें राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्काराने सन्मानित

उरण (दैनिक संध्या) : महाराष्ट्र दिनाचे तसेच कामगार दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्ह्यातील उरण येथील जेष्ठ समाजसेविका संगीता सचिन ढेरे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेत राज्य शासनाच्या प्रतिष्ठित पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अलिबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या या गौरव



सोहळ्यात त्यांना सन्मानचिन्ह व मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना ढेरे यांच्या कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. संगीता ढेरे यांनी उरण परिसरात महिला सक्षमीकरण, बालकल्याण, शिक्षण आणि समाजजागृती या क्षेत्रांत सातत्याने काम केले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक महिलांना स्वावलंबनाचा मार्ग सापडला असून सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.महिला बचत गटांना एकत्रित करून त्यांच्यात समन्वय घडून आणून विविध उत्पादने वस्तू निर्मितीला त्यांनी प्रोत्साहन दिले आहे. वेगवेगळे मेळावे, स्टॉल लावून तसेच महिलांच्या सर्वांगीण प्रगती साठी विविध कार्यक्रम त्यांनी राबविले आहे.त्यांच्या या कार्याची दखल घेत राज्य शासनाने त्यांना या मानाच्या पुरस्काराने सन्मानित केले.संगीता ढेरे यांना मिळालेला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार हा त्यांच्या कार्याची पावती असून समाजसेवेचा आदर्श ठरतो.उरण मधील जेष्ठ महिला सामाजिक कार्यकर्त्या संगीता ढेरे यांना राज्य शासनाचा प्रतिष्ठित पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### 'कर्मवीर' या गोत्राने मी समाजात कार्यरत! - ॲड. सतिश गोरडे

पिंपरी (दैनिक संध्या) : 'धार्मिक आणि पवित्र कार्य करताना आपण गोत्र सांगतो; पण सामाजिक कार्यात मी 'कर्मवीर' या गोत्राने कार्यरत आहे!' असे भावपूर्ण उद्गार ज्येष्ठ विधिज्ञ, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष सदस्य आणि रयत शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी ॲड. सतिश गोरडे यांनी रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी येथे शुक्रवार, दिनांक ०१ मे २०२६ रोजी काढले. रयत माजी विद्यार्थी मेळावा २०२६ मध्ये प्रमुख वक्ता म्हणून मार्गदर्शन करताना ॲड. सतिश गोरडे बोलत होते. प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी माजी विद्यार्थी संघटना अध्यक्ष बाळासाहेब वाघिरे, माजी विद्यार्थी नगरसेवक संजोग वाघिरे, माजी विद्यार्थिनी पत्रकार अश्विनी सातव, विशाल मासुळकर, प्रशांत म्हेत्रे, ॲड देविदास कुदळे, उपप्राचार्या डॉ. कामायनी सुर्वे, उपप्राचार्या डॉ. संगीता अहिवळे, उपप्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर, प्रा. डॉ. नीळकंठ डहाळे, प्रा. मनीषा शिंदे, ॲड. देविदास कुदळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. ॲड. सतिश गोरडे पुढे म्हणाले की, 'जन्म कुणाच्याही हातात नसतो. जन्म कुठे होईल? कधी होईल? गरीब अथवा श्रीमंत घरात होईल, हे कोणीच सांगू शकत नाही; पण आपल्या कर्तृत्वाप्रमाणे आपण भरारी घेऊ शकतो. गुरुजनांचा आदर्श घेऊन समाजात चांगले कार्य करावे असे शिक्षण मिळाले. ग्रंथप्रेमातून महापुरुषांची चरित्रे वाचली. सुमारे तेहतीस वेळा हृदयविकाराचा झटका येऊनही कर्मवीर भाऊराव अण्णा हे समाजासाठी आणि शैक्षणिक कार्यासाठी कार्यरत राहिले; तसेच माउली लक्ष्मीबाई यांनी आपले मंगळसूत्र गहाण ठेवून अण्णांच्या शैक्षणिक कार्याला मदत केली, या गोष्टी मनाला खूप प्रेरणा देऊन गेल्या. त्यामुळे विधी क्षेत्रात विधिज्ञ म्हणून कार्यरत झाल्यावर गरीब कैद्यांना सोडविण्यासाठी विनामूल्य मदत केली. येरवडा कारागृहात पुरुष कैद्यांची व्यवस्था व महिला कैद्यांची व्यवस्था मर्यादा ओलांडली आहे. अशा परिस्थितीत किरकोळ गुन्हेगार, गरीब, अनाथ आणि केवळ अपघाताने गुन्हेगार ठरलेल्या चौदाशे कैद्यांना मोफत समुपदेशन करून त्यांची मुक्तता केली. भारतीय संविधानाला पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल वेगवेगळ्या ठिकाणी पंचाहत्तर मार्गदर्शनपर व्याख्याने दिली.



**प्रामाणिकपणा, सेवा आणि समर्पण जपण्याची गरज; पुरस्कार विजेतेच जिवंत आदर्श - राज्यपाल जिष्णू देव वर्मा**

# राज्यपालांच्या हस्ते न्यूजमेकर्स अचिव्हर्स अवॉर्ड्सचे वितरण

**मुंबई (दै. संध्या)**

समाजासमोर असलेल्या विविध आव्हानांच्या पार्श्वभूमीवर प्रामाणिकपणा, सेवा आणि समर्पण या मूल्यांचे जतन करण्याची गरज असून पुरस्कार विजेते हे या मूल्यांचे जिवंत उदाहरण आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले.

आफ्टरनून व्हॉइस"तर्फे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे आयोजित 18 व्या न्यूजमेकर्स अचिव्हर्स अवॉर्ड्स 2026 कार्यक्रमात राज्यपाल श्री. वर्मा बोलत होते. यावेळी संगीत नाटक अकादमीच्या अध्यक्ष पद्मश्री डॉ.संध्या पुरेचा, राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, ऑफ्टरनून व्हाईसच्या मुख्य संपादक डॉ.वैदेही तमन तसेच पुरस्कारप्राप्त मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राज्यपालांनी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा देत उपस्थितांचे स्वागत केले. समाजातील लोकसेवा, कला-संस्कृती, पत्रकारिता, सामाजिक कार्य, शिक्षण आणि नवोन्मेष अशा विविध क्षेत्रांतील योगदानामुळे समाज समृद्ध होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यपाल श्री. वर्मा यांनी समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करणारे "18 वे न्यूज मेकर्स अचिव्हर्स अवॉर्ड्स 2026" हे व्यासपीठ समाजात उच्च आदर्श, जबाबदारी आणि राष्ट्रनिर्मितीची भावना दृढ करणारे असल्याचे सांगितले. यावेळी जीवनगौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार रमेश पतंगे, राही भिडे, गायक हरिहरन, अभिनेत्री सुषमा




देशपांडे, समाजसेवक दत्ता बारगाजे आणि अभिनेत्री झीनत अमान यांचे राज्यपालांनी विशेष अभिनंदन केले. तसेच 2026 मधील सर्व "न्यूजमेकर अचिव्हर्स" पुरस्कार विजेत्यांना शुभेच्छा दिल्या.

संगीताच्या माध्यमातून भारतीय संस्कृती समृद्ध करणाऱ्या हरिहरन यांचे योगदान उल्लेखनीय असल्याचे सांगताना, माहिती अधिकाराद्वारे पारदर्शकता वाढविणाऱ्या विजय कुंभार यांच्या कार्याचेही त्यांनी कौतुक केले. तसेच योगेंद्र बांगर यांच्या 'आजीबाईची शाळा' या उपक्रमाचा उल्लेख करत शिक्षण कोणत्याही वयात व्यक्तीला सक्षम बनवू शकते, असे त्यांनी सांगितले. महाराष्ट्राची परंपरा प्रगतिशील विचार, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक समृद्धीची असल्याचे अधोरेखित करत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. आजही महाराष्ट्र उद्योग, प्रशासन आणि सामाजिक विकासात देशाचे नेतृत्व करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते गायिका उषा मंगेशकर, पद्मश्री गायक हरिहरन, पद्मश्री शेफ संजीव कपूर, अभिनेत्री सुषमा देशपांडे, पत्रकार राही भिडे आणि समाजसेवक दत्ता बारगजे यांचा प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

## वनप्लसतर्फे वनप्लस पॅड ४ सादर

**पुणे (दै. संध्या)**

जागतिक तंत्रज्ञान ब्रँड वनप्लस ने आज आपला नवीन फ्लॅगशिप टॅबलेट वनप्लस पॅड ४ सादर केला आहे. हा टॅबलेट प्रॉडक्टिव्हिटी, क्रिएटिव्हिटी आणि एंटरटेनमेंटला नवे आयाम देण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. स्नॅपड्रॅगन® ८ एलिट जन ५ प्लॅटफॉर्म, ३३.५३ से.मी (13.2-इंच) ३.४के डिस्प्ले, १३,३८० एमएएच ची प्रचंड बॅटरी आणि फ्लॅगशिप प्रॉडक्टिव्हिटी टूल्स यामुळे वनप्लस पॅड ४ पोर्टेबल फॉर्ममध्ये शक्तिशाली पीसी लेव्हल परफॉर्मन्स देतो.




प्रोफेशनल्स डिझाइन केलेले, क्रिएटर्स आणि मल्टीटास्कर्ससाठी खास डिझाइन केलेला हा टॅबलेट टॉप-टियर हार्डवेअर आणि स्मार्ट सॉफ्टवेअर अनुभव एकत्र आणतो.

यात १४४ हर्ट्झ रिफ्रेश रेट, स्पॅशियल ऑडिओसह आठ स्पीकर्स, ८० वॉट सुपरव्हूक फास्ट चार्जिंग आणि ॲडव्हान्स्ड कूलिंग दिले आहे, ज्यामुळे सतत स्मूथ परफॉर्मन्स मिळतो. वनप्लस पॅड ४ ची किंमत ५४,९९९ रुपये पासून सुरू होते (बँक ऑफर्ससह) आणि विक्री ५ मे २०२६ पासून सुरू होईल.

वनप्लस पॅड ४ च्या कोअरमध्ये स्नॅपड्रॅगन® ८ एलिट जन ५ प्रोसेसर असून त्यासोबत १२ जीबी पर्यंत एलपीडीडीआर५एक्स रॅम आणि ५१२ पर्यंत यूएफएस ४.१ स्टोरेज दिले आहे. त्यामुळे डिमांडिंग टास्क्समध्येही फास्ट आणि रिस्पॉन्सिव्ह परफॉर्मन्स मिळतो.

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा बारावी विज्ञान शाखेचा निकाल ९९.१४ टक्के

**बारामती (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी फेब्रु. / मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा एकूण निकाल 99.14% लागला आहे. प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या तुलनेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. महाविद्यालयाने यावर्षी देखील गुणात्मक दर्जा टिकवून ठेवला आहे.

वाणिज्य शाखेतील पटेल अफरिन फरहान या विद्यार्थ्याने 93.83% गुण प्राप्त करीत महाविद्यालयामध्ये व शाखेमध्ये प्रथम, शास्त्र शाखेत जाधव तेजस विजय या विद्यार्थ्याने 90.83% गुण



मिळवून प्रथम क्रमांक, कला शाखेत कु. वेदपाठक ऐश्वर्या अवधूत या विद्यार्थीनीने 87.33% गुण मिळवून प्रथम क्रमांक व व्य. शिक्षण शाखेत झारी असिम जमिर या विद्यार्थ्याने 66.67% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. महाविद्यालयाचा वाणिज्य शाखेचा निकाल 91.94%, कला शाखेचा 72.59% व व्यवसाय शिक्षण विभागाचा निकाल 100.00% लागला आहे. संपूर्ण महाविद्यालयाचा निकाल 91.81% लागला आहे हे याठिकाणी विशेष उल्लेखनीय होय. १२वी परीक्षेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या घवघवीत यशाबद्दल अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव श्री. मिलिंद शाह (वाघोलीकर), सर्व संस्था पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा, कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्य श्री. गोरखनाथ मोरे, समन्वयक श्री. संजय शेंडे, श्री. रमेश गोसावी, परीक्षा विभाग प्रमुख श्री. श्रीरंग शेळके यांचेसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## जिल्ह्यात चिमुरडीवरील अत्याचार व हत्या कायदा सुव्यवस्थेचे मोठे अपयश

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील कायदा सुव्यवस्थेची लक्तरे आधीच वेशीवर टांगली गेलेली आहेत. राज्यात महिला व लहान मुलीही सुरक्षित नाहीत हे सातत्याने उघड होत आहे. पुणे जिल्ह्यातील एका चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्याचा प्रकार महाराष्ट्राच्या नावाला काळीमा फासणारा आहे, हे गृहविभागाचे अपयश असून गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक राहिलेला नाही. राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री नसल्याने गुन्हेगार मोकाट आहेत, त्याचाच हा प्रकार असून आतातरी देवेंद्र फडणवीस यांनी जनाची नाही तर मनाची बाळगून प्रायश्चित म्हणून तरी गृह मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा व पूर्णवेळ सक्षम गृहमंत्री राज्याला द्यावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस



प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुती सरकारवर तोफ डागली, ते पुढे म्हणाले की, गृहविभागात भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे, खालपासून वरपर्यंत भ्रष्टाचार बोकाळला आहे. बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख प्रकरणातील निघृणता, स्वारगेट एसटी स्टँडवरील बलात्कार, केंद्रीय मत्र्यांच्या घरातील मुलींना छेडछाड, बदलापूरातील शाळकरी मुलींवरील लैंगिक अत्याचार, अशोक खरात प्रकरण, महिला व मुलींचे बेपत्ता होणारे प्रकार... ड्रग्जच्या खुलेआम काळ्याधंद्याने उडता महाराष्ट्र झाला आहे, तरुण पिढीला व्यसनाच्या खाईत ढकलले जात असताना गृहमंत्री म्हणून काहीतरी ठोस कारवाई करणे अपेक्षित आहे पण फक्त घोषणा होतात कारवाई मात्र काहीच होत नाही. राज्यातील महिला सुरक्षा, कायदा व सुव्यवस्थेचा वाजलेला बोजवारा याला थेट गृहमंत्रीच जबाबदार आहेत, असा हल्लाबोल करत भाजपा महायुती सरकारचा भ्रष्टाचार सुस्साट असून जनता व प्रशासन यांच्यात मिसिंगलिंक आहे, कायदा व सुव्यवस्थेमध्ये मिसिंग लिंक आहे, असा हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी केला आहे.

देशभर जनगणना सुरु झाली असली तरी जातनिहाय जनगणना मात्र होत नाही. जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा पंतप्रधांनी केली होती पण ती आता करत नाहीत कारण हा व्यक्ती फक्त फेकूच नाही तर अत्यंत खोटारडा आहे. मुंह में राम और बगल में नथुराम, असे त्यांचे काम आहे. मोदी यांचा आचार, विचार व व्यवहार हे अगदी उलटे आहे. नथुराम गोडसे महात्मा गांधींच्या पाया पडला व नंतर त्यांचा खून केला, मोदी संसदेच्या पाया पडले व त्यांनी संविधान व लोकशाहीचा गळा घोटला. १०० स्मार्ट सिटी, दरवर्षी दोन कोटीरोजगार, शेतकऱ्यांचे दुप्पट उत्पन्न, रुपयाची घसरण थोपवणे यातील काहीच त्यांनी केलेले नाही. आता जनगणनेसाठी आधार कार्ड मागत आहेत, ते लिंक करणार आहेत, आधारशी सर्व लिंक केलेले आहे, पण मतदार यादीशी ते लिंक करत नाहीत, असेही सपकाळ म्हणाले.

या पत्रकार परिषदेला प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे ही उपस्थित होते.

## विजेच्या धक्क्याने डिकसळ येथील तरुण जखमी

**भिगवण (दै. संध्या)**

इंदापूर तालुक्यातील डिकसळ येथे शेतात काम करत असताना तरुणांना विजेचा धक्का बसल्याने तरुण गंभीर जखमी झाला असून त्यावर भिगवण येथील खाजगी रुग्णालयात उपचार चालू आहेत सूर्यकांत विठ्ठल हगारे असे या तरुणाचे नाव आहे.

हगारे हे आपला मुलगा स्वरूप सूर्यकांत हगारे यांच्या समवेत नेहमीप्रमाणे शनिवार ( ता.२) रोजी सकाळी शेतात काम करत होते. यावेळी शेतातील बांधावरून जाणाऱ्या विजेच्या खांबाला दिल्या जाणाऱ्या तान तारेला विद्युत प्रवाह चालू होता. यावेळेस शेतातील काम करताना चुकून सूर्यकांत हगारे यांच्या हाताचा स्पर्श त्या ताण तारेला होताच विद्युत शक्तीने त्यांना खेचून घेतले. दरम्यानच्या काळात एक मिनिट विद्युत पुरवठा खंडित झाल्याने शेतात काम करणाऱ्या महिलांनी व आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी त्यांना तातडीने ताण तारेपासून दूर केले विजेच्या धक्क्याने बेशुद्ध अवस्थेत



सूर्यकांत हगारे यांना खाजगी वाहनाने भिगवण येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे त्यांना अतिदक्षता विभागात ठेवले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी दिली. सूर्यकांत हगारे हे भारतीय आयुर्विमा महामंडळाचे बारामती प्रतिनिधी म्हणून काम करत आहेत. याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाची संपर्क केला असता त्यांनी याबाबत प्रतिक्रिया देण्याचे टाळले.

# आर्यारवी एंटरटेनमेंटचा राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव दिमाखात संपन्न!

**भीमराव पांचाळे, सतीश पुळेकर, के. राघवकुमार आणि प्रभाकर तोडणकर यांना 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान..!**

**मुंबई (दै. संध्या)**

लघुपट निर्माते, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञानाला हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या 'आर्यारवी एंटरटेनमेंट' आयोजित चौथ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा ३० एप्रिल रोजी परेल येथील शिरोडकर हायस्कूलमध्ये अत्यंत उत्साहात पार पडला.

चित्रपट, नाट्य आणि साहित्य क्षेत्रातील दिग्गजांच्या उपस्थितीने या सोहळ्याला विशेष झळाळी प्राप्त झाली होती. या महोत्सवात त्यांच्या संबंधित क्षेत्रातील बहुमूल्य योगदानाबद्दल खालील मान्यवरांना 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले: भीमराव पांचाळे (प्रसिद्ध गझल गायक - गझल नवाज), सतीश पुळेकर (ज्येष्ठ अभिनेते व दिग्दर्शक),के. राघवकुमार (ज्येष्ठ नाट्यकर्मी) आणि प्रभाकर तोडणकर (ज्येष्ठ समाजसेवक) कार्यक्रमाचा शुभारंभ सुनील शिर्के (संस्थापक, शिर्के जनकल्याण प्रतिष्ठान) यांच्या हस्ते नारळ वाढवून आणि मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाला. कवी शब्दश्री विलास देवळेकर यांनी सादर केलेल्या भारदस्त 'गाऱ्हाण्याने' सोहळ्याची मंगलमय सुरुवात झाली.

आयोजक महेश्वर भिकाजी तेटांबे यांनी प्रास्ताविकातून महोत्सवाचा उद्देश स्पष्ट केला, तर एका व्हिडिओ फितीच्या (AV) माध्यमातून या सोहळ्याचा तीन वर्षांचा प्रवास उलगडण्यात आला. याप्रसंगी गझल नवाज




भीमराव पांचाळे यांनी गझल गाऊन उपस्थित मान्यवर आणि रसिकांची दाद मिळवली. आपले मनोगत व्यक्त करताना भीमराव पांचाळे म्हणाले की, "महेश्वर तेटांबे हे नवीन कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्याचे मोलाचे कार्य करत आहेत. विजेत्यांना रोख रक्कम देऊन प्रोत्साहित करण्याचा त्यांचा उपक्रम कौतुकास्पद आहे." ज्येष्ठ अभिनेते सतीश पुळेकर म्हणाले की, जीवनगौरव पुरस्काराने जरी मला सन्मानित केलं तरी अजूनही काम करण्याची ऊर्मी माझ्यात आहे. आणि "महेश्वर तेटांबे हे नवीन कलाकारांना त्यांचं मनोबल वाढवण्यासाठी जे प्रोत्साहन आणि व्यासपीठ मिळवून देत आहेत ही कौतुकास्पद कामगिरी आहे."

या सोहळ्यात विनोदवीर आशिष सातपुते, एम नटराज, संदीप भाकरे, समीर काळबे आणि नृत्यांगना कु. ग्रीष्मा वहाळकर यांच्या सादरीकरणाने रंगत आणली. प्रसिद्ध अभिनेते व मुलाखतकार मयूर धुरी यांनी आपल्या ओघवत्या शैलीत प्रभावी सूत्रसंचालन केले.

व्यासपीठावर अभिनेते कांचन पगारे, अभिनेत्री सिद्धी कामथ, जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, उद्योजक खलील शिरगावकर, लेखक-दिग्दर्शक अनंत सुतार आणि अभिनेत्री लक्ष्मी गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी अविनाश राऊत, निलेश घाडी, राहुल शिंदे, पत्रकार केतन भोज आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी महेश्वर तेटांबे यांनी भावूक होत सर्वांचे आभार मानले. ते म्हणाले, "चांगला स्वभाव हा गणितातल्या शून्यासारखा असतो; त्याला स्वतःला किंमत नसते, पण दुसऱ्यासोबत जोडला तर त्याची किंमत वाढते. तुमच्या सर्वांच्या आशीर्वादामुळेच हा प्रवास इथवर पोहोचला आहे." राष्ट्रगीताने या सोहळ्याची सांगता झाली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अंगणवाडी सेविका गाडेकर यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम उत्साहात

नारायणगाव (दैनिक संध्या) : माळवाडी- खोडद येथील अंगणवाडी सेविका शालन तुळशीराम गाडेकर aयांनी चाळीस वर्ष अंगणवाडीतील चिमुकल्यांची सेवा केल्याबद्दल खोडद ग्रामस्थांच्या वतीने सेवानिवृत्तीचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. शालन गाडेकर यांनी आपल्या सेवाकाळात लहान मुलांना स्वतःच्या नातवंडांप्रमाणे जपले. मुलांना घरून शाळेत आणणे,शाळा सुटल्यानंतर सुरक्षितपणे घरी सोडणे,मुलांची स्वच्छता, खेळ आणि शिक्षण याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले.त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे पालकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले होते. या निरोप समारंभाला रोहिदास डोके, उत्तम डोके, अनिल डोके, रवींद्र थोरात, मंगेश डोके, चेअरमन सचिन थोरात, किरण गाडेकर यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक आणि पालक उपस्थित होते.

### जेजुरी परिसरात घरफोडी, दोन तोळ्यांचे सोन्याचे दागिने लंपास

जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी येथील कडेपठार पायथा परिसरातील ज्ञानोबा नगर येथे अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून घरातील 22 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे. जेजुरी पोलिसांनी याबाबत दिलेली माहिती अशी की जेजुरी येथील ज्ञानोबा नगर येथे राहणाऱ्या प्रवीण आनंदा मेमाणे यांचे बंद घराचे कुलूप कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून कपाटाचे लॉक तोडून त्यातील 13 ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी आणि 9 ग्रॅम वजनाचे सोन्याचे डोरले व वाट्या असा सुमारे 70 हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला ही घटना 29 ते 30 एप्रिल दरम्यान घडली आहे. याच दिवशी आणखी तीन बंद घरांची कुलपे अज्ञात चोरट्याने तोडली असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे तपास करीत आहेत.

### जेजुरी येथील मल्हार व्हिला सोसायटीत तरुणाची आत्महत्या

जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी येथील मल्हार व्हीला सोसायटी मध्ये राहणाऱ्या स्वप्नील शाम साळुंखे या तरुणाने घरातील फॅनला दोरी बांधून गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. जेजुरी पोलिसांनी याबाबत दिलेली माहिती अशी की जेजुरी येथील मल्हार व्हीला सोसायटी मध्ये शुक्रवार दिनांक 1 रोजी स्वप्नील साळुंखे या तरुणाने फॅन ला दोरी बांधून गळफास घेवून आत्महत्या केली. या घटनेची माहिती मिळताच जेजुरी पोलिसांनी स्वप्नील यास ग्रामीण रुग्णालयात दाखल केले मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सदर तरुणाचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. या आत्महत्येचे कारण समजले नसून जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तपास करीत आहेत.

## सासवडमध्ये महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाचा अभूतपूर्व उत्साह;

# कामगारांच्या हस्ते झाले ध्वजारोहण

सासवड (दै. संध्या)



महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून सासवड येथे उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. येथील शिवस्मृती प्रतिष्ठान आणि सासवड नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पालखी मैदानावर भव्य ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. यावर्षीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, श्रमिकांचा सन्मान करत 'सुप्रभा प्रोटेक्टिव्ह प्रॉडक्ट्स' या कंपनीच्या कामगारांना ध्वजारोहणाचा मुख्य मान देण्यात आला.

शिवस्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष व माजी आमदार संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला. यावेळी सुप्रभा कंपनीचे जनरल मॅनेजर चंद्रभान बलवाडा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमास उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, नगरसेविका स्मिता सुहास जगताप, लिना वढणे, अर्चना जगताप, नगरसेवक ज्ञानेश्वर गिरमे आणि प्रदीप राऊत यांसह

रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रमोद धनावडे, माजी अध्यक्ष डॉ. प्रविण जगताप, गुलाबराव गायकवाड, अनिल उरवणे, प्रा संदीप टिळेकर यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कामगार दिनाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी सासवडमध्ये एका कंपनीच्या कामगारांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्याची परंपरा जोपासली जाते. या परंपरेनुसार यंदा सुप्रभा कंपनीच्या कामगारांना हा बहुमान मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन आणि शहीद जवानांना श्रद्धांजली वाहून झाली. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत आणि 'जय जय महाराष्ट्र माझा' या महाराष्ट्र गीताने अवघा परिसर दुमदुमून गेला.

एनसीसीचे गजेंद्र अहिवळे यांनी उपस्थितांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या, तर चंद्रभान बलवाडा यांनी कामगारांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली.

या सोहळ्याचे नियोजन शिवस्मृती प्रतिष्ठानचे अनिल उरवणे, रविंद्रपंत जगताप, ओंकार दळवी आणि कराडे यांनी केले होते. कार्यक्रमाला सासवडमधील विविध संस्थांचे पदाधिकारी, नागरिक आणि कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बारामती पोटनिवडणूक मतमोजणी ४ मे रोजी; प्रशासनाची जय्यत तयारी

बारामती (दै. संध्या)

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान पार पडले असून या निवडणुकीची मतमोजणी सोमवार, दि. ४ मे रोजी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ गोडाऊन, एमआयडीसी बारामती येथे सकाळी ८ वाजल्यापासून सुरू होणार आहे. मतमोजणीसाठी प्रशासनाने सर्वतोपरी तयारी पूर्ण केली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे यांनी दिली.

या मतमोजणीच्या कामकाजाकरिता पुरेशा अधिकारी-कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. निकालाच्यादिवशी कायदा व सुव्यवस्था बिघडू नये याकरिता पर्याप्त व पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात असून त्याअनुषंगाने प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

ईव्हीएम मशीनच्या मतमोजणीसाठी २० टेबल्स तर पोस्टल मतपत्रिकांच्या मतमोजणीसाठी ६ टेबल्सची व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रक्रियेसाठी ३० सूक्ष्म निरीक्षक, ३० मतमोजणी पर्यवेक्षक, ३० मतमोजणी सहाय्यक तसेच इतर कर्मचारी व अधिकारी मिळून सुमारे ३०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सहा.निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्नील रावडे यांच्याकडून मतमोजणी करिता नियुक्त कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

मतमोजणीच्या अनुषंगाने मतमोजणी केंद्रावर आवश्यक साहित्य उपलब्ध व व्यवस्था करण्यात आल्या आहेत. मतमोजणी केंद्रात प्रवेशाकरिता संबंधित कर्मचारी, उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी तसेच माध्यमांच्या प्रतिनिधींना प्रवेशिकाही देण्यात आलेल्या आहेत. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतमोजणीस्थळी प्रवेशासाठी प्रथमच क्युआर कोड प्रणाली लागू करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना तसेच उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना देण्यात आलेल्या प्रवेशिकांवर क्युआर कोड देण्यात आला आहे. तो क्युआर कोड स्कॅन करूनच प्रवेश दिला जाणार आहे.

माध्यमांच्या प्रतिनिधींना फेरीनिहाय निकाल तातडीने उपलब्ध करून देण्याकरिता मतमोजणी केंद्रावर स्वतंत्र बैठक व्यवस्था (माध्यम कक्ष) तयार करण्यात आली आहे.

मतमोजणी केंद्रात सर्व कर्मचारी व प्रतिनिधींना मोबाइल वापरण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच, सुरक्षेच्या दृष्टीने कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याचेही प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.



## प्लास्टिक बॉटल संकलनासाठी सासवड नगरपरिषदेला १० यूनीट; रोटरी क्लब ऑफ पुरंदरचा उपक्रम

सासवड (दै. संध्या)

स्वच्छ आणि सुंदर सासवडचा संकल्प अधिक दृढ करत, शहरात प्लास्टिक प्रदूषणाला लगाम घालण्यासाठी रोटरी क्लब ऑफ पुरंदरने पुढाकार घेतला आहे.

रोटरी क्लबच्या वतीने सासवड नगरपालिकेला १० 'प्लास्टिक बॉटल संकलन केंद्रे' प्रदान करण्यात आली असून, या उपक्रमाचा अधिकृत शुभारंभ माजी आमदार रोटरीयन संजय जगताप यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला.

वाढत्या प्लास्टिक कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी ही केंद्रे बसवण्यात येणार आहेत.


शहरातील विविध वर्दळीच्या ठिकाणी ही संकलन केंद्रे उपलब्ध राहणार असल्याने, नागरिकांना वापरलेल्या रिकाम्या बाटल्यांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे आता सुलभ होणार आहे.

रोटरी क्लबने सामाजिक उत्तरदायित्व जपून राबवलेल्या या उपक्रमाचे शहरवासीयांकडून स्वागत होत आहे.

या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, नगरसेवक अजित जगताप, ज्ञानेश्वर गिरमे, प्रदीप राऊत, ज्ञानेश्वर जगताप, स्मिता जगताप, लिना वढणे, अर्चना जगताप यांसह रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रमोद धनावडे, माजी अध्यक्ष डॉ. प्रविण जगताप, गुलाबराव गायकवाड, अनिल उरवणे, अभिजीत बारवकर, ॲड आनंद जगताप, जीवन कड, प्रा. संदीप टिळेकर, तुषार जगताप यांसह रविंद्रपंत जगताप, धनंजय जगताप, कॅप्टन किरण पुरंदरे, रोटरीचे सदस्य आणि नगरपालिका कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'जनगणना २०२७' कल्याणकारी योजनांची सुनिश्चिती- सुनेत्रा पवार

पुणे (दै. संध्या)



राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी जनगणना २०२७' मध्ये सक्रीय सहभाग नोंदवून आपली स्व-गणना पूर्ण केली आहे.

'जनगणना २०२७' ही केवळ नोंदणी नसून शाळा, रुग्णालय तसेच कल्याणकारी योजनांची सुनिश्चिती करते, यामध्ये राज्यातील प्रत्येक व्यक्ती, कुटुंबाला विविध पायाभूत सुविधांचा लाभ मिळावा, याकरीता नागरिकांनी या राष्ट्रीय मोहिमेत सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले आहे.

श्रीमती पवार म्हणाल्या, जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्याला महाराष्ट्र राज्यात १ मे पासून सुरुवात झाली असून 'स्व-गणना' प्रक्रिया १५ मे २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. याकरिता केंद्र शासनाने https://se.census.gov.in/ संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले असून नागरिकांनी या संकेतस्थळाचा वापर करुन आपल्या सोयीनुसार अद्ययावत माहिती भरावी.

स्व-गणनेच्या टप्प्यानंतर १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणक गृहभेटी देणार असून जाऊन प्रत्यक्ष माहिती संकलित करणार असून यावेळी प्रगणकास संपूर्ण सहकार्य करावे. आपण दिलेली माहिती अत्यंत गोपनीय असण्यासोबत ती कायद्याने सुरक्षित असणार आहे. या माहितीचा वापर राज्याच्या विकास आणि नियोजनासाठी केला जाणार आहे, त्यामुळे या राष्ट्रीय मोहिमेत राज्यातील नागरिकांनी एकजुटीने सहभागी होऊन स्व-गणना करावी, असे आवाहनही श्रीमती पवार यांनी केले.

यावेळी उपायुक्त तथा शहर जन गणना अधिकारी विजय लांडगे, सहायक आयुक्त तथा चार्ज अधिकारी बाळासाहेब ढवळे आदी उपस्थित होते.

## मंत्री आशिष शेलार यांनी घेतले जेजुरीच्या खंडोबा देवाचे दर्शन

जेजुरी (दै. संध्या)



महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी जेजुरी गडावर जावून महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा देवाचे दर्शन घेतले.

शनिवार दिनांक 2 रोजी दुपारी बारा वाजता राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री अड आशिष शेलार यांनी जेजुरी गडावर जावून कुलदैवत खंडोबा देवाचे दर्शन घेतले.दर्शनानंतर जेजुरी गडावर महाराष्ट्र शासनाच्या वतीने तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामे सुरू असून या कामांची पाहणी करून ही कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांना ना.आशिष शेलार यांनी दिल्या.

जेजुरी गडावर श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने ना. आशिष शेलार यांचा देवाची पगडी देवून सन्मान करण्यात आला. तसेच जेजुरी शहर भाजपाच्या वतीने ही त्यांचा सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाचा दरवर्षी मर्दानी दसरा उत्सवाचा सोहळा मोठ्या दिमाखात साजरा होतो .या उत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा शासनाने द्यावा अशी मागणी जेजुरी देवसंस्थानच्या वतीने करण्यात आली. शासनाने राज्य उत्सवाचा दर्जा दिल्यास जेजुरीच्या खंडोबा देवाची धार्मिक सांस्कृतिक महती आंतर राष्ट्रीय स्तरावर पोहचेल ,महाराष्ट्राची धार्मिक संस्कृती देश विदेशात पोहचण्यास मदत होईल अशी मागणी निवेदनाद्वारे देवसंस्थान च्या वतीने करण्यात आली.

तसेच ऐतिहासिक काळात शीघ्रकवी शाहीर सगनभाऊ यांनी पोवाडे ,लावण्या लिहिल्या या सगनभाऊंच्या स्मृती जतन करण्यासाठी दरवर्षी त्यांची पुण्यतिथी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी जेजुरीत साजरी केली जाते. या कार्यक्रमास शासनाच्या वतीने अनुदान मिळावे अशी मागणी यावेळी जेजुरी शहर भाजपाच्या वतीने शहर प्रमुख सचिन पेशवे यांनी केली.

या वेळी जेजुरी गडावर श्री मार्तंड देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अड विश्वास पानसे, विश्वस्त मंगेश घोणे, डॉ. राजेंद्र खेडेकर, जेजुरी शहर भाजपाचे अध्यक्ष सचिन पेशवे, भाजपा जिल्ह्याच्या महिला आघाडी प्रमुख अलका शिंदे, जिल्हाचे सरचिटणीस गणेश भोसले, पदाधिकारी प्रसाद अत्रे, कल्पेश सूर्यवंशी, सदानंद बारभाई, शिवाजी बारसुडे, दशरथ उबाळे,आदी उपस्थित होते.

## करसल्लागारांनी मूल्यवर्धित सेवा व धोरणात्मक समुपदेशनावर भर द्यावा : धनंजय आखाडे

पुणे (दै. संध्या)

“ऑटोमेशनच्या युगात करसल्लागारांची भूमिका केवळ रिटर्न फायलिंगपुरती मर्यादित राहिलेली नाही. आधुनिक काळात करसल्लागारांनी धोरणात्मक समुपदेशन आणि मूल्यवर्धित सेवा याकडे वाटचाल करणे अत्यावश्यक आहे,” असे प्रतिपादन राज्य वस्तू व सेवा कर (जीएसटी) विभागाचे माजी अतिरिक्त आयुक्त धनंजय आखाडे यांनी केले.

महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन (एमटीपीए) च्या ४६ व्या वर्धापनदिन सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. शिवाजी रस्त्यावरील एमटीपीए सभागृहात आयोजित या कार्यक्रमास वर्धापनदिन सोहळा समितीचे अध्यक्ष ॲड. नरेंद्र सोनावणे, एमटीपीएचे अध्यक्ष ॲड. अनुरुद्र चव्हाण, जीएसटी प्रॅक्टिशनर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे प्रमुख ॲड. पार्थ बधेका, तसेच ज्येष्ठ कर सल्लागार ॲड. अशोक संघवी यांची प्रमुख उपस्थिती होती.

धनंजय आखाडे पुढे म्हणाले की, “तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होत असलेल्या प्रगतीमुळे कर क्षेत्रात नवी आव्हाने निर्माण होत आहेत. केवळ कायद्याचे ज्ञान पुरेसे नाही, तर न्यायालयीन निर्णय, विश्लेषणाच्या नव्या पद्धती आणि प्रशासनातील बदल समजून घेणे आवश्यक आहे. ई-फायलिंगमुळे पारदर्शकता वाढली असून, प्रणाली अधिक ऑटोमेटेड झाली आहे. जीएसटी लवाद (जीएसटीएटी) प्रक्रियाही सुरू होत आहे. त्यामुळे करसल्लागारांनी स्वतःला अधिक सक्षम करून सल्लागाराच्या




भूमिकेत बदल घडवणे काळाची गरज आहे.” या प्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सदस्यांचा सन्मान करण्यात आला. नवनीतलाल बोरा, मनोज चितळीकर, विनोद राहते यांना ‘एमटीपीए कोहिनूर’, सीए ईशान पाटकर यांना ‘एमटीपीए जीएसटी आयकॉन’, सीएमए श्रीपाद बेदरकर व सीएमए हर्षद देशपांडे यांना ‘एमटीपीए स्पेशल अचिव्हमेंट’, नंदकुमार निन्हाली, सीए सचिन गांधी, ॲड. विनोद म्हस्के यांना ‘एमटीपीए बेस्ट फ्रेंड’, ॲड. निखिल देशमुख व सीए सारिश हेंद्रे यांना ‘एमटीपीए रायझिंग स्टार’, तसेच ॲड. दत्तात्रय सावंत, ॲड. कमलेश नागर, सीए अक्षय मोदी, ॲड. राजेश जागे यांना ‘एमटीपीए स्टार ऑफ द इयर’ पुरस्काराने गौरविण्यात आले.

ॲड. नरेंद्र सोनावणे म्हणाले, “एमटीपीएचा वर्धापनदिन हा केवळ वर्षपूर्तीचा सोहळा नसून, आपल्या सर्वांच्या एकात्मतेचा आणि कुटुंबभावनेचा उत्सव आहे. प्रत्येक सदस्याच्या संघर्ष, समर्पण आणि निष्ठेचा हा गौरव आहे. आपण केवळ व्यावसायिक नसून देशाच्या आर्थिक प्रगतीचे मूक शिल्पकार आहोत, या जाणिवेतून काम केले पाहिजे.”

ॲड. अनुरुद्र चव्हाण यांनी प्रास्ताविकात सांगितले की, “संघटनेची सदस्यसंख्या २६०० पेक्षा अधिक झाली असून, सीए, वकील, करसल्लागार आणि सीएमए अशा विविध क्षेत्रातील व्यावसायिकांचा त्यात समावेश आहे. संघटनेची व्याप्ती राज्याबरोबरच देशभर वाढत आहे, ही अभिमानाची बाब आहे.” ॲड. पार्थ बधेका यांनी संस्थात्मक निर्णयांचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, “संस्थेची उद्दिष्टे सामूहिक असतात आणि कालानुरूप त्यात लवचिकता आवश्यक असते. निर्णयांचे फायदे तात्काळ दिसत नसले तरी दीर्घकालीन असतात.” ॲड. अशोक संघवी यांनी करदाते आणि कायदा यांच्यातील दुवा म्हणून आपली भूमिका महत्त्वाची आहे. नवीन आयकर कायदा आणि जीएसटीएटी ही आगामी आव्हाने असून, सतत शिकण्याची वृत्ती जपणे आवश्यक आहे, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. प्रणव सेठ यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. ज्ञानेश्वर नरवडे यांनी मानले. मिलिंद हेंद्रे, सुभाष घोडके, सीए अजय शर्मा, सौरभ शहा, विजय उणेचा, अश्विनी जाधव व नेहा नाणेकर यांनी सोहळ्याचे यशस्वी संयोजन केले.